


सुखसमृद्धीचा सण आला आहे अक्षय तृतीया,
तुम्हा सर्वांना या शुभ दिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..!

अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.00 । अंक १८६ । रविवार १९ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com

## अक्षयप्राप्ती म्हणजेच सहजयोग...




अनादिकालापासून अक्षय तृतीयाच्या शुभ दिवशी लोकांनी परमेश्वराकडे अनेक गोष्टी मागितल्या आहेत. आजच्या दिवशी अशी प्रार्थना करतात की, हे देवा, महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडू दे. पाऊस झाला पाहिजे म्हणजे आमची शेती बहरून येईल. ठीक आहे, हे मागणे योग्य आहे की शेतीची उपज चांगली व्हावी, पाऊस पडावा, लोकांना अन्न-पाणी मिळावे. आता महाराष्ट्रात मोठी समृद्धी आली. साखरेचे कारखाने झाले. त्यातून पुष्कळ साखर तयार होऊ लागली. पण त्यानंतर दारू तयार करायला सुरुवात झाली. दारू बनवून आपण पैसे कमावले, परमेश्वराच्या विरोधात कार्य करू लागले आणि आता या कलियुगात, जेव्हापासून कृतयुग सुरू झाले आहे, तेव्हा या गोष्टी फार काळ चालणार नाहीत. त्यांनी दारू बनवायला सुरुवात केली, त्यात राजकारण आणले, गरीब लोकांचे नुकसान केले.आणि ते म्हणू लागले, आम्ही देवाला मानत नाही.

आपल्या मनात असा विचार येत नाही की अशी कोणती गोष्ट मागावी किंवा असा कोणता मार्ग शोधावा ज्यामुळे एखादी अक्षय गोष्ट प्राप्त होईल, तो म्हणजे सहजयोग.

अधिक माहितीसाठी
https://www.sahajayogamumbai.org
सौजन्य: निर्मला धाम आश्रम
आरडगाव राहुरी
८८७१५१९१९१

## महत्वाचे..

### शिष्यवृत्ती परीक्षा ऐन उन्हाळ्यात, राज्याच्या शिक्षण विभागाचा अजब प्रकार

पुणे : ऐन उन्हाळ्यात चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा घेणार असल्याने शिक्षण परीक्षा परिषदेच्या गोंधळाचा विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप वाढला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाच्या 'महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे'कडून ऐन उन्हाळ्यात चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यातयेत आहे. राज्यात उन्हाचा पारा ऐन ४४ अंशापर्यंत वाढलेला असतांना २४ एप्रिलला चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आला आहे. येत्या रविवार दि. २४ एप्रिलला ही परिक्षा होतेय. सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याची परीक्षा परिषदेने सूचना जारी केली आहे.

# ही महिला अधिकाराची भ्रूणहत्या

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांचे भ्रूणहत्या केली. ज्या ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणले त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, असा इशारा देताना या पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करत त्यांचा खरा चेहरा समोर आणला असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली असं नरेंद्र मोदी म्हणाले. नरेंद्र मोदी म्हणाले की, आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी ६० टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहतोय. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला असं नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करूच.

भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आलं, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठं होतं. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झालं. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असंच घडलं.

देशातील कोट्यवधी महिला संसदेकडे डोळे लावून बसल्या होत्या. ज्यावेळी महिलांच्या हितासंबंधी संसदेत प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांच्या अधिकारांवर गदा आली त्यावेळी काँग्रेस सारख्या परिवारवादी पक्ष टाळ्या वाजवत होते.

ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे.

सभागृहात एकूण ५२८ खासदारांनी मतदान केलं. त्यामुळे विधेयकाच्या मंजुरीसाठी आवश्यक असणारी आणखी ५४ मतं मिळवण्यात सरकारला अपयश आलं. दरम्यान, १३१ व्या घटनादुरुस्ती विधेयकाला मंजूर करुन घेण्यात अपयश आल्यानंतर केंद्र सरकारनं इतर दोन विधेयकं पटलावर मांडण्याआधीच मागे घेतली.

### काँग्रेसने नकारात्मक राजकारण केले

काँग्रेस सातत्याने नकारात्मक राजकारण केले. याच काँग्रेसने जनधन, आधार, डिजिटल पेमेंट यासह तिहेरी तलाक, कलम ३७० हटवण्याला विरोध केला. समान नागरी आचरसंहितेला काँग्रेसने त्याला विरोध केला. त्यांनी 'एक देश एक निवडणूक'ला विरोध केला. त्याचसोबत सर्वच सुधारणांना काँग्रेसने खोटं बोलत विरोध केला.

### आमचा संकल्प कायम



काँग्रेसने देशाचे मोठे नुकसान केले आहे. कारण प्रत्येक सुधारणेला काँग्रेसचा विरोध असतो. जनता त्यांना करारा जवाब देईल असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. महिला आरक्षण विधेयकाचा विषय हा क्रेडीटचा नव्हता, तर देशातील निम्म्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देण्याचा होता असेही ते म्हणाले. संसदेत महिला आरक्षण विधेयक पास झालं नाही याचा अर्थ आम्ही हरलो नाही. आमचा संकल्प कायम आहे. आम्ही महिलांना त्यांचे अधिकार मिळवून देणार आहोत.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

# चोरीचे २५ लाखांचे दागिने जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील एका सराफ व्यावसायिकाने चोरीचे सुमारे २५ लाख रुपये किमतीचे सोने खरेदी केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी सुमारे २० तोळे सोने जप्त केले आहे. या कारवाईमुळे सोनई परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेवासा तालुक्यातील करजगाव येथील मिनाबाई ज्ञानदेव गडाख (वय ५७) या पुण्याहून नगरकडे बसने प्रवास करत असताना त्यांच्या पिशवीतील सुमारे २० तोळे सोने चोरीस गेले होते. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा (क्र. २३८/२०२६) दाखल करण्यात आला होता.

### पोलिसांच्या कारवाईचे कौतुक

**पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आम्हाला न्याय मिळाला. त्यांच्या कार्यामुळे आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, अशी प्रतिक्रिया फिर्यादीच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.**

या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील माया कल्याण भोसले या संशयित महिलेला ताब्यात घेतले. चौकशीत तिने चोरी केलेले सोने एका सराफ व्यावसायिकास विकल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित सराफावर कारवाई करत मुद्देमाल हस्तगत केला. दरम्यान, कारवाई दरम्यान पोलिसांशी हुज्जत व धक्काबुक्की झाल्याच्या चर्चाही परिसरात रंगल्या आहेत. संबंधित व्यावसायिकासह काही जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती असून, त्यात त्याच्या नातलगाचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेनंतर सोनईतील संबंधित सराफ व्यावसायिकाचे दुकान एक दिवस बंद राहिल्याने विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या या व्यावसायिकावर झालेल्या कारवाईमुळे गावात मोठी चर्चा सुरू आहे.

# जनगणनेसाठी बदल्यांना ब्रेक

## डिजिटल जनगणना २०२६ साठी प्रशासन सज्ज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील आगामी जनगणना प्रक्रिया सुरळीत आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत राज्य सरकारने जिल्हा परिषदांतील गट 'क' आणि 'ड' कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती दिली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हा निर्णय जाहीर केला असून, जनगणनेशी संबंधित शिक्षकांसह सर्व कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या तात्पुरत्या थांबवण्यात आल्या आहेत.

या निर्णयामुळे जनगणनेसाठी आवश्यक मनुष्यबळ स्थिर राहणार असून माहिती संकलन, नोंदणी आणि पडताळणी प्रक्रिया अधिक अचूक व वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे. राज्यात २०२६-२७ ची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबवली जाणार आहे.

पहिल्या टप्प्यात १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत घरांची यादी व मोजणी केली जाणार आहे. त्याआधी १ मे ते १५ मे दरम्यान 'स्व-गणना' (डशश्रष-एर्पीशअॅरींळेप) ही सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून दिली जाणार आहे. सुमारे १५ वर्षांनंतर होणाऱ्या या जनगणनेत घरांची स्थिती, पाणी, वीज तसेच मालमत्तेची माहिती नोंदवली जाणार आहे.

दरम्यान, २३ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत राज्यभरात प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक प्रशिक्षण बॅचमध्ये सुमारे ४० ते ४५ प्रशिक्षणार्थी सहभागी होणार असून कमाल मर्यादा ५० ठेवण्यात आली आहे. दोन फील्ड ट्रेनर्सच्या टीममार्फत प्रत्येक बॅचचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) या डिजिटल प्लॅटफॉर्मवर सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. प्रशिक्षण, उपस्थिती व माहिती व्यवस्थापनाच्या सर्व प्रक्रिया याच प्रणालीद्वारे पार पडणार आहेत, ज्यामुळे संपूर्ण यंत्रणा अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होणार आहे. प्रशिक्षण केंद्रांवर स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले असून, प्रशिक्षणाच्या सुरुवातीला व शेवटी अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि प्रशिक्षणार्थ्यांचा अभिप्राय घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या सर्व उपाययोजनांमुळे राज्यातील जनगणना प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित, अचूक आणि वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## शाळांच्या 'दुकानदारी'वर सरकारचा चाप; पालकांना खरेदीचे स्वातंत्र्य


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच शाळांकडून गणवेश, पुस्तके आणि इतर साहित्य खरेदीसाठी केली जाणारी सक्ती रोखण्यासाठी राज्य सरकारने कडक पाऊल उचलले आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार, कोणत्याही शाळेला विशिष्ट दुकानातूनच शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास पालकांना भाग पाडता येणार नाही. नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित शाळांवर थेट कायदेशीर कारवाई होणार आहे.

दरवर्षी अनेक शाळा ठराविक दुकानदारांशी संगनमत करून पालकांवर दबाव टाकतात, अशा तक्रारी सातत्याने येत होत्या. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने स्पष्ट आदेश देत सर्व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना ही सक्ती पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. नव्या आदेशानुसार, विद्यार्थ्यांसाठी केवळ NCERT, SCERT (बालभारती) किंवा संबंधित शिक्षण मंडळाने मान्यताप्राप्त पुस्तकेच वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## विधानपरिषदेसाठी रुपाली ठोंबरेंची दावेदारी

### संधी देण्याची सुनेत्रा पवारांकडे पत्राद्वारे मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून उमेदवारीची मागणी केली आहे. मी एक सक्षम उमेदवार असून मला विधानपरिषदेवर काम करण्याची संधी मिळावी, अशी विनंती त्यांनी या पत्रातून केली आहे. रुपाली ठोंबरे यांनी पत्रात आपल्या राजकीय प्रवासाचा लेखाजोखा मांडला आहे. मागील २० वर्षांपासून राजकारणात सक्रिय असून माजी नगरसेविका आणि शहर सुधारणा समिती अध्यक्ष म्हणून अनेक विकासकामे मार्गी लावल्याचे त्यांनी नमूद केले.

# राज्यात डेटा सेंटर गुंतवणुकीला चालना

## जागा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यात डेटा सेंटर क्षेत्राच्या विकासाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. मध्य आशियातील अनेक नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याच्या पार्श्वभूमीवर, करार पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंपन्यांना त्वरित जागा उपलब्ध करून द्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत डेटा सेंटर प्रकल्पांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले होते. विविध विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकल्पांच्या सद्यस्थितीची माहिती सादर केली.

डेटा सेंटर प्रकल्पांसाठी अखंड वीजपुरवठा हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने, संबंधित कंपन्यांना प्राधान्याने वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश ऊर्जा विभागाला देण्यात आले. या संदर्भात आवश्यक ती पावले उचलून विजेची अखंडता सुनिश्चित करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सिडको मार्फत डेटा सेंटरसाठी स्वतंत्र 'लॅण्ड बँक' विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सब-स्टेशनसाठी आवश्यक जागा त्वरित उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला आहे.

सिडकोकडून डेटा सेंटरसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. रस्ते, पाणीपुरवठा, वीज जोडणी आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधला जात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.



**■ मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, डेटा सेंटर क्षेत्रातील प्रकल्पांसाठी आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया ठराविक कालमर्यादेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. विशेषत: जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया जलदगतीने पार पाडण्यावर त्यांनी भर दिला. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी शासनाने वेळेत निर्णय घेणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.**

ऊर्जा विभागाकडूनही भविष्यातील गरज लक्षात घेऊन पुरेशा विजेची उपलब्धता सुनिश्चित केली जात असल्याचे सांगण्यात आले. आगामी काळात महाराष्ट्र डेटा सेंटर गुंतवणुकीसाठी प्रमुख केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# नियमांना बगल की घोटाळेबाजांना अभय?

## ओला, दुर्गंधीयुक्त गहू थेट गोदामात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** शासकीय गोदामात ओला आणि दुर्गंधीयुक्त गहू आल्यानंतर पुरवठा विभागाची कार्यपद्धती संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या सडक्या गव्हाचा पंचनामा करून तो चक्क गोदामातच उतरवून साठवण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. नियमानुसार खाण्यायोग्य नसलेले धान्य तात्काळ नष्ट करणे बंधनकारक असताना, त्याची साठवणूक कोणासाठी केली जात आहे? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, अधिकाऱ्यांनी भ्रमणध्वनी बंद केल्याने संशय अधिकच बळावला आहे.



या प्रकरणात वाहतूक कंत्राटदार गाढे यांची भूमिका संशयास्पद आहे. पाऊस नसतानाही गहू भिजलेला असणे, हा वजन वाढवण्यासाठी केलेल्या 'पाणी रॅकेट'चा अघोरी प्रकार असल्याचे उघड होत आहे. इतके गंभीर आरोप असूनही मुजोर कंत्राटदारावर अद्याप फौजदारी कारवाई का झाली नाही? प्रशासन केवळ नोटिस काढून गाढेना पाठीशी घालनार आहे का? असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.

नियमानुसार, निकृष्ट धान्य आढळल्यास ते तत्काळ मोहोरबंद करून प्रयोगशाळेत पाठवणे आणि मानवी वापरासाठी अयोग्य असल्यास ते नष्ट करणे गरजेचे असते. मात्र, नेवाशात कायदे धाब्यावर बसवून हा गहू थेट गोदामात साठवण्यात आला. अयोग्य धान्य गोदामात उतरवून प्रशासन नेमके काय साध्य करत आहे? पुराव्यांशी छेडछाड करण्यासाठीच ही घाई केली गेली का? असे अनेक प्रश्न आता अनुत्तरित आहेत.

### जल्हाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी!

अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत निकृष्ट धान्य साठवणे हा गंभीर गुन्हा आहे. स्थानिक प्रशासनाच्या संशयास्पद भूमिकेमुळे आता जिल्हाधिकाऱ्यांनी यात स्वत: लक्ष घालणे गरजेचे आहे. गोदामातील नोंदी, चित्रीकरण आणि वाहतुकीचा मार्ग तपासल्यास या 'पाणी घोटाळ्या'चे सत्य समोर येईल. कंत्राटदार गाढे याचे परवाने रद्द करून सखोल चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा विविध संघटनांनी दिला आहे.

### अधिकारी कोणाला घाबरतात?

या प्रकरणावर अधिकृत माहिती देण्यासाठी पुरवठा निरीक्षक आणि कोठार प्रमुख उपलब्ध नाहीत. वारंवार संपर्क करूनही त्यांनी भ्रमणध्वनी स्वीकारले नाहीत. कंत्राटदार गाढे याच्या दबावामुळे अधिकारी 'संपर्क क्षेत्राबाहेर' झाले आहेत की भ्रष्टाचारात त्यांचेही हात गुंतले आहेत? याचे उत्तर प्रशासनाला द्यावेच लागेल.

ADVANCED, AFFORDABLE, ACCURATE
अत्याधुनिक, परवडणारे व अचूक
नगर जिल्ह्यात प्रथमच..लवकरच आपल्या सेवेत
फक्त ५ मिनिटात
Ai basis 3 T. MRI, 128 Slice CT Scan
IN OPEN MRI
रू. ~~10,000/-~~ ची तपासणी
फक्त रू.2200/-
वैशिष्ट्ये : * ॲडव्हान्स व आधुनिक मशिनद्वारे तपासणी * तज्ञ डॉक्टरांच्या टिमकडून रिपोर्ट * वेळ व पैशाची बचत * २४ तास तत्पर व विनम्र सेवा.
ॲक्युरेट डायग्नोसिस सेंटर
सिटीकेअर हॉस्पिटल कॅम्पस, तारकपूर बस स्टॅण्ड समोर, अहिल्यानगर.
डॉ. रणजित सत्रे M. 93251 32736

# संपादकीय

## वारीचा वारसा आणि वादाचे सावट

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ' अशी शिकवण देणाऱ्या वारकरी संप्रदायाची ओळख जगाला एक सहिष्णू आणि समतावादी विचार म्हणून आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या पवित्र संप्रदायाभोवती राजकीय आणि वैचारिक वादाचे जे वलय निर्माण झाले आहे, ते चिंताजनक आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी वारकरी संप्रदायात 'कट्टरपंथीयांची घुसखोरी' होत असल्याची टिप्पणी केली आणि त्यानंतर समाजमनातून उमटलेल्या प्रतिक्रिया, नेत्यांनी थेट महाराजांची नावे घेऊन केलेले आरोप-प्रत्यारोप यामुळे महाराष्ट्राच्या या महान परंपरेला गालबोट लागताना दिसत आहे.

पंढरीची वारी ही केवळ पायी चालण्याची प्रक्रिया नसून तो महाराष्ट्राचा सांस्कृतिक कणा आहे. वारीत सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येतात, जिथे केवळ 'विठ्ठल' महत्त्वाचा असतो. मात्र, अलीकडे संप्रदायातील काही मंडळी उघडपणे राजकीय पक्षांची भूमिका घेताना दिसत आहेत, तर दुसरीकडे राजकीय नेतेही संप्रदायातील अंतर्गत विषयांवर भाष्य करून वादाला तोंड फोडत आहेत. जेव्हा अध्यात्माच्या व्यासपीठावरून राजकीय प्रचार किंवा विखारी टीका केली जाते, तेव्हा संप्रदायाचे मूळ स्वरूप धोक्यात येते. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये थेट वीस महाराजांची नावे घेऊन त्यांना 'पक्षपाती' म्हणणे, हे केवळ त्या व्यक्तींचा अपमान नसून तो संपूर्ण वारकरी परंपरेचा अवमान आहे.

धार्मिक क्षेत्रातील संत-महंतांबद्दल आक्षेपार्ह बोलणे सर्वथा चुकीचे आणि निषेधार्ह आहे. समाजाला दिशा देण्याचे काम ज्यांचे आहे, त्यांच्याबद्दल पातळी सोडून बोलणे हे आपल्या सुसंस्कृतपणाला शोभणारे नाही. मात्र, या प्रकरणाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. संतांनी आणि कीर्तनकारांनीही स्वतःवर काही बंधने पाळणे आवश्यक आहे. कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व्हावे, समाजविद्वेष नको. जर संतांच्या वाणीतून भेदाभेदाची भाषा किंवा राजकीय पक्षपाताचा गंध येऊ लागला, तर सर्वसामान्य वारकऱ्याचा विश्वास डळमळीत होतो. तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, 'बोलण्यासारखे चालावे' ही अपेक्षा संतांकडून असणे गैर नाही.

वारकरी संप्रदाय हा मुळातच 'लोकशाही' मानणारा संप्रदाय आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत या संप्रदायातील काही प्रसिद्ध कीर्तनकार आणि महाराजांच्या विधानांनी नव्या वादाला निमंत्रण दिले आहे. विशेषतः सोशल मीडियाच्या युगात कीर्तनातील 'विनोद' आणि 'राजकीय टोलेबाजी' यांच्यातील पुसट होत चाललेली रेषा हा चिंतेचा विषय ठरत आहे. यापूर्वी अनेकदा काही महाराजांनी विशिष्ट राजकीय पक्षांच्या व्यासपीठावरून केलेली भाषणे किंवा निवडणुकीच्या काळात केलेली आवाहने यामुळे संप्रदायात 'पक्षपातीपणा' शिरल्याची भावना निर्माण झाली आहे.

जेव्हा एखादा महाराज व्यासपीठावरून महापुरुषांबद्दल विवादित वक्तव्य करतो किंवा स्त्रियांच्या पेहरावावरून आणि वर्तणुकीवरून आक्षेपार्ह टिप्पणी करतो, तेव्हा त्याचा परिणाम केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रतिमेवर होत नाही, तर संपूर्ण वारकरी परंपरेच्या प्रतिमेवर होतो. काही महाराजांनी तर जाती-पातीच्या समीकरणांवर भाष्य करून समाजातील तेढ वाढवण्याचे काम केल्याचे आरोप झाले आहेत. २० महाराजांची नावे घेऊन त्यांना 'कट्टरपंथी' ठरवण्यामागे हीच पार्श्वभूमी आहे. जेव्हा संप्रदायाचा प्रतिनिधी म्हणून मिरवणारे लोक एखाद्या विशिष्ट विचारधारेचे 'प्रवक्ते' बनतात, तेव्हा ते विठ्ठलाच्या 'सर्वसमावेशक' विचारांपासून दूर जातात.

कीर्तनाचा मूळ उद्देश 'भक्ती' आणि 'ज्ञान' हा होता, पण आता त्याचे स्वरूप 'इव्हेंट' आणि 'राजकीय शक्तिप्रदर्शना'कडे झुकत आहे. काही महाराजांच्या मालमत्तेवरून आणि त्यांच्या जीवनशैलीवरूनही वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात. जेव्हा अध्यात्म हे जनसेवेऐवजी स्वार्थासाठी किंवा सत्तेच्या जवळ जाण्यासाठी वापरले जाते, तेव्हा त्यातून 'कट्टरता' जन्म घेते. संप्रदायातील जुन्या जाणत्या मंडळींनी याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. संतांनी कोणत्याही राजकीय पक्षाचे 'ब्रँड म्बेसेडर' न होता समाजाचा 'विवेक' होणे अपेक्षित आहे. जर ही 'स्वच्छता' स्वतःहून झाली नाही, तर बाह्य शक्तींना हस्तक्षेप करण्याची आणि संप्रदायावर टीका करण्याची संधी मिळते, हेच या वादातून स्पष्ट होते.

सध्या माध्यमांमधून आणि सोशल मीडियावरून ज्या प्रकारे या प्रकरणाचे भांडवल केले जात आहे, ते थांबवण्याची गरज आहे. राजकीय नेत्यांनी आपली राजकीय लढाई संसदेत किंवा मैदानात लढावी, ती विठ्ठलाच्या दारात किंवा वारीच्या वाटेवर आणू नये. तसेच, वारकरी संप्रदायातील धुरिणांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. कट्टरपंथीय विचार जर खरोखरच शिरकाव करत असतील, तर ते वेळीच रोखणे ही संप्रदायाची नैतिक जबाबदारी आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. इथे वैचारिक मतभेद असू शकतात, पण मनभेद असता कामा नयेत. वारकरी संप्रदाय हा राजकारणाच्या पलीकडचा विषय आहे. संतांनी संयम पाळावा आणि राजकारण्यांनी धार्मिक सीमांचे भान राखावे, तरच हा दैदिप्यमान वारसा पुढच्या पिढीला शुद्ध स्वरूपात मिळेल. अन्यथा, 'भेदाभेद भ्रम अमंगळ' म्हणणारे आपण केवळ वादाच्या भोवऱ्यातच अडकून पडू.

## श्रीरामपुरात आज 'जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा' विषयावर जाहीर व्याख्यान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता जोतीराव फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त शहरात एका भव्य वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महामानव विचार प्रबोधन समितीच्या वतीने येत्या उद्या रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजता 'जागृतीचा अग्नी अखंड तेवत ठेवा' या विषयावर जाहीर व्याख्यान संपन्न होणार आहे.

म्हाडा कॉलनी शेजारी, नवीन बोंबले पाटीलनगर येथील सहार्षा हॉलमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध सत्यशोधक विचारवंत प्रा. सचिन झगडे (श्रीगोंदा) हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन अपंग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक प्रा. संजय साळवे यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाला सुधाकर बागुल, दिलीप बडदे, फ्रान्सिस शेळके, मुस्ताकभाई तांबोळी, अशोक दिवे, जीवन सुरडे, ऍड. अमोल सोनवणे, अशोक शेळके, राजेश हिवाळे, सुशील पठारे, राजू लोंढे, अमोल मिसाळ, संतोष गायकवाड भागवत विधाटे, संतोष देवराय आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी श्रीरामपूर तालुक्यातील नागरिक, विचारवंत, तरुण, महिला आणि विद्यार्थ्यांनी या वैचारिक सोहळ्याचा लाभ घ्यावा व महामानवांच्या विचारांची शिदोरी घेऊन समाजात जनजागृतीचा अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी या व्याख्यानास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन 'महामानव विचार प्रबोधन समिती'च्या वतीने करण्यात आले आहे.

# संवत्सर पुलाच्या दुरुस्तीला सुरुवात

## आमदार आशुतोष काळेंच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी:** जुन्या मुंबई-नागपूर महामार्गावरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. या कामासाठी आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्याला यश आल्याची माहिती त्यांनी दिली.

या पुलाच्या मध्यभागी भगदाड पडल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव काही महिन्यांपूर्वी वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे कोपरगाव, वैजापूर व छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या नागरिकांना मोठा फटका बसला होता. तसेच पर्यायी मार्गांवर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.



या पार्श्वभूमीवर आमदार काळे यांनी १८ मार्च रोजी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पुलाच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती. त्यानुसार संबंधित विभागाने कामाला सुरुवात केली आहे.

पूल वाहतुकीसाठी बंद असल्याने स्थानिक व्यावसायिकांनाही मोठा फटका बसला होता. मात्र दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने लवकरच वाहतूक पूर्ववत होणार असून नागरिक व वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून स्थानिकांनी आमदार काळे यांचे आभार मानले आहेत.

## देवीवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कला कार्यानुभव उपक्रम यशस्वी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे देवीवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कला कार्यानुभव उपक्रम घेण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेते रघुनाथ कुटे यांनी प्रत्यक्ष कार्यशाळेत सहभाग घेतला. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना चांगलीच आवडली. सहशिक्षक अभिषेक घटमाळ यांनी पर्यावरणपूरक, उन संरक्षक कडक कागदी टोपी बनवायचं शिकवले. तसेच मुख्याध्यापिका वनिता चिलका यांनी विविध डाळी, तांदूळ यापासून कलाकृती बनवायचे शिकवले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल कुटे, सोमनाथ मुंगसे, अनिता शेटे, लता ताके,अंगणवाडी सेविका रुक्मिणी तांबे, मदतनीस राधिका मुंगसे यांचे व पालकांचे सहकार्य लाभले. शाळेला वेळोवेळी गटशिक्षणाधिकारी संजय कळमकर, विस्ताराधिकारी भागीनाथ बडे, केंद्रप्रमुख भास्कर तांबे, केंद्रमुख्याध्यापक सतिशकुमार भोसले यांचे मार्गदर्शन लाभत असते.



## ॲट्रॉसिटीचा खोटा गुन्हा मागे घेण्याची मागणी; टाकळीभान ग्रामस्थांचे निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथे जागेच्या वादातून दाखल करण्यात आलेला ॲट्रॉसिटीचा गुन्हा खोटा असून तो तत्काळ रद्द करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना दिलेल्या निवेदनाद्वे केली आहे.

निवेदनानुसार, १३ एप्रिल २०२६ रोजी दोन कुटुंबांमध्ये वाद झाल्यानंतर कोणतीही सखोल चौकशी न करता श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात बाजार समितीचे संचालक मयूर अशोक पटारे, सागर गायकवाड व इतरांविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला. मयूर पटारे हे स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाले असतानाही त्यांना अटक करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, पोलिस ठाण्याच्या आवारातच काही जणांकडून पटारे यांना मारहाण झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामागे राजकीय कटकारस्थान असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देताना अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बँकेत विसरलेल्या बांगड्या परत करून घडवले प्रामाणिकपणाचे दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथील जिल्हा सहकारी बँकेच्या शाखेत प्रामाणिक पणाचे प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे शाखा अधिकारी बाबासाहेब गागरे यांनी लोकर मध्ये विसरलेल्या दोन तोळ्याच्या सोन्याच्या बांगड्या शोधून त्या संबंधित खातेदार कुटुंबाला प्रामाणिकपणे परत केल्या संबंधित खोसे कुटुंबीयांनी यात्रेनिमित्त लोकर मधील सोन्याच्या वस्तू काढल्या होत्या मात्र गडबडीमध्ये दोन सोन्याच्या बांगड्या बँकेत राहून गेल्या ही बाब शाखा अधिकारी बाबासाहेब गागरे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ सीसीटीव्ही मदतीने तपास सुरू केला संबंधित खातेदाराचा शोध घेत त्यांना सोन्याच्या बांगड्या सुरक्षितपणे परत केल्या बांगड्या परत मिळाल्याने खातेदार बाबासाहेब खोसे रोहिणी खोसे यांनी समाधान व्यक्त करत गा गरे यांच्या प्रामाणिकपणाचे मनापासून कौतुक केले यावेळी प्रसाद कर्नावट प्रवीण तांबे रोखपाल अर्चना झावरे मच्छिंद्र खामकर आदी उपस्थित होते.



# लवांडेवर नेवासा पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** विश्व हिंदू परिषदेचे धर्माचार्य जिल्हा संपर्क प्रमुख प्रशांत लक्ष्मण बहिरट रा. घोगरगाव, ता. नेवासा यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार संतांबद्दल घुसखोर म्हणून वक्तव्य करणाऱ्या विकास लवांडेवर नेवासा पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.

दिलेल्या फिर्यादीत प्रशांत बहिरट यांनी नमूद केले आहे की दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते विकास लवांडे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील सुमारे २० कीर्तनकार महाराजांविषयी आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार,लवांडेने घेतलेल्या पत्रकार परिषदेत २० कीर्तनकार वारकरी संप्रदायात घुसखोरी करून धार्मिक विचारांना खतपाणी घालत आहेत, तसेच निवडणूक काळात महाराज 'पाकिट' घेतात, असा उल्लेख करण्यात आल्याचे म्हटले आहे.



या वक्तव्यात श्री दत्त देवस्थानचे गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज, स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज (कोषाध्यक्ष, श्रीराम मंदिर, अयोध्या), महंत रामगिरीजी महाराज यांसह इतर संतांचा एकेरी उल्लेख करून बदनामी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. नेवासा पोलीस ठाण्यात फिर्याद क्र.०५२९ / २०२६ दि.१७ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे. कॉ. घुगे करत आहेत.

# पाटबंधारे विभागाचा श्रीरामपूर पालिकेला चकवा

## शेतीसाठीचे आवर्तन पहाटे सुटले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर (शफीक बागवान)-** भंडारदऱ्यातून आज पहाटे शेतीसाठीचे आवर्तन सोडण्यात आले आहे . यामुळे श्रीरामपूर नगरपालिकेची कुचंबना झाली आहे. पाटबंधारे खात्याने श्रीरामपूर पालिकेला हा चकवा दिल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

पिण्याच्या पाण्याबरोबर पाटबंधारे विभागाने हे आवर्तन सोडले असते तर श्रीरामपूर पालिकेने आवर्तन बंद होण्याच्या दोन दिवस अगोदर स्वच्छ आणि निर्जंतुक असे हे पाणी तलावात घेण्याचे नियोजन केले असते.

पिण्याच्या पाण्याच्या आवर्तना बरोबरच शेतीच्या पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह आमदार हेमंत ओगले यांनी पाटबंधारे विभागाकडे केली होती. मात्र याबाबत सर्वत्र मौन पाळले गेले.

श्रीरामपूर नगरपालिकेने तलाव पूर्ण भरून घेतल्यानंतर आज पहाटे शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. सध्या श्रीरामपूर नगरपालिकेच्या तलावात असलेले पाणी अत्यंत निळेशार असे असून ते आरोग्यास घातकही ठरण्याची चिन्हे आहेत.या पाण्याला वास असून भविष्यात नागरिकां साठी अपायकारक ठरू शकते, असे काही तज्ञांचे मत आहे.

**रस्त्याने वाहणारे पाणी**

शहराची लोकसंख्या एक लाखाच्या आसपास आहे. दरडोई शंभर लिटर पाणी पुरविण्यासंदर्भात शासनाचा आदेश आहे. शासनाच्या या नियमाचे पूर्णपणे पालन केले जाते. शहरातील नागरिकांना पुरेपूर पाणी पुरविले जाते. तरीही नागरिक पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी करतात. त्या निरर्थक आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत. असे काही कर्मचाऱ्यांचे मत आहे. याउलट बहुसंख्य ठिकाणी आपापले पाणी भरून झाल्यानंतर देखील हेच स्वच्छ निर्जंतुक पाणी कुठे रस्त्यावर वाहताना दिसते तर अनेक ठिकाणी ते शौचालयाबरोबरच मोकळ्या मैदानात वाहताना दिसते, काही जण हेच पाणी मैदानात तर काहीजण याच पाण्याने गाड्याही धुतात. ही बाब मानवतेच्या दृष्टिकोनातून हितावह नाही. पाणी भरून झाल्यानंतर आपापल्या मोटारी बंद कराव्यात. नागरिकांनी पाण्याचे मूल्य ओळखून दूरदृष्टी ठेवल्यास पाण्याचे संकट भासणार नाही. आपल्याला मिळत असलेले पाणी हे पूर्ण क्षमतेने मिळते. त्यात कोणतीही कपात केली जात नाही. नागरिकांनी पाण्यासंदर्भात स्वतः आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे नागरिक खाजगीत बोलतात. पालिकेचे सत्ताधारी पदाधिकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना काही बंधने असून कोणतीही चूक नसताना त्यांना मात्र काही अजाण नागरिकांकडून असंतोषाचे धनी व्हावे लागते. असे काही सुजाण जाणकार नागरिक खाजगीत बोलत आहेत.

# आश्वी येथील महिलेवर हल्ल्यानंतर मादी बिबट्यासह बछडा जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** |संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक परिसरात गेल्या काही दिवसांपासून असलेल्या बिबट्याच्या दहशतीला काही अंशी पूर्णविराम मिळाला आहे. शुक्रवारी सकाळी एका महिलेवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर वनविभागाने राबवलेल्या शोधमोहिमेला मोठे यश आले असून, शनिवारी एका मादी बिबट्याला तिच्या बछड्यासह जेरबंद करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी आश्वी बुद्रुक येथील बाळासाहेब सुमन खेमनर (वय ५९) या महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केला होता. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून, सध्या त्यांच्यावर प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

घटनेचे गांभीर्य ओळखून राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी वनविभागाला तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार वनविभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम हाती घेतली. तसेच, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी प्रवरा रुग्णालयात जाऊन जखमी महिलेची भेट घेतली. त्यांनी महिलेच्या प्रकृतीची विचारपूस करत डॉक्टरांकडून उपचारांची सविस्तर माहिती जाणून घेतली आणि त्यांना धीर दिला.

शनिवारी वनविभागाच्या पथकाकडून केरुजी बाचकर यांच्या गट क्रमांक २३६ मधील गिनी गवतात शोधमोहिम सुरू असताना त्यांना एक मादी बिबट्या आणि तिचा बछडा पकडण्यात यश आले. त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

परिसरात अद्यापही इतर बिबटे असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वनविभागाने अधिक सतर्कता बाळगली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात आणखी दोन पिंजरे लावण्यात आले असून गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे.

दरम्यान, रात्रीच्या वेळी बिबट्यांच्या हालचालींवर बारीक नजर ठेवण्यासाठी आधुनिक थर्मल ड्रोनचा वापर करून गस्त घातली जात आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी वनविभागाचे पथक तैनात असून, नागरीकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडू नये आणि आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

# उंबरी बाळापूर अन् आश्वी परिसरात एकाच रात्री चार ठिकाणी सशस्त्र दरोडे १०-१५ तोळे सोन्यावर डल्ला !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर आणि आश्वी बुद्रुक परिसरात शनिवारी पहाटे सशस्त्र दरोडेखोरांनी मोठा धुमाकूळ घातला. एकाच रात्री चार वेगवेगळ्या ठिकाणी घरफोड्या करून चोरट्यांनी अंदाजे १० ते १५ तोळे सोने आणि सव्वा दोन लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. या घटनेत दरोडेखोरांनी एका वृद्ध महिलेच्या कानातील दागिने जबरदस्तीने ओरबाडल्याने त्यांचे कान फाटून त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या भीषण प्रकारामुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी पहाटे १२:३० वाजेच्या सुमारास ७ ते ८ सशस्त्र दरोडेखोरांच्या टोळीने आपला मोर्चा उंबरी बाळापूर परिसराकडे वळवला. चोरट्यांनी प्रथम शेडगाव-उंबरी बाळापूर नवीन पुलालगत असलेल्या किसन खेमनर यांच्या 'हॉटेल बानाई'ला लक्ष्य केले. मात्र, तेथे रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू हाती न लागल्याने चोरट्यांनी चक्क हॉटेलमधील खाद्यपदार्थांवर ताव मारला आणि तिथून काढता पाय घेतला.

त्यानंतर या टोळीने जवळच असलेल्या भाऊसाहेब खेमनर यांच्या वस्तीवर धाड टाकली. चोरट्यांनी घरात शिरून सर्व सामानाची उचकापाचक केली. खेमनर कुटुंबाने दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी येथून अंदाजे २ तोळे सोने, २५ ते ३० हजार रुपयांची रोकड आणि एक मोबाईल चोरला. घराबाहेर आवाज झाल्याने हौशीराम (पप्पू) खेमनर हे बाहेर आले असता, दरोडेखोरांनी त्यांच्यावर दगडफेक करत तिथून पळ काढला.

रात्री दीड वाजेच्या सुमारास ही टोळी प्रवरा कालव्यालगत राहणाऱ्या चांगदेव उंबरकर यांच्या घरी पोहोचली. घराचा मागील दरवाजा तोडून ३ ते ४ दरोडेखोर आत शिरले. त्यांनी उंबरकर कुटुंबातील तरुणांच्या गळ्याला कुऱ्हाड आणि कती लावून जीवे मारण्याची धमकी दिली. उंबरकर यांच्या माहितीनुसार, चोरट्यांनी येथून १० ते १२ तोळे सोने आणि ३० हजारांची रोकड पळवली. अत्यंत क्रूरता दाखवत दरोडेखोरांनी घरातील वृद्ध महिलेच्या कानातील दागिने ओरबाडून काढले, ज्यामध्ये त्यांचे कान फाटून त्या रक्तबंबाळ झाल्या. यावेळी प्रतीक उंबरकर या तरुणाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, दरोडेखोरांनी त्याच्यावरही दगडफेक केली.

उंबरी बाळापूरमधील घटनांनंतर चोरट्यांनी आश्वी बुद्रुक शिवारातील मच्छिंद्र होडगर यांच्या घरावर डल्ला मारला. येथे चोरट्यांनी ४ ते ५ तोळे सोने आणि १ लाख ७३ हजार रुपयांची रोकड चोरून नेली. होडगर कुटुंबीय गाढ झोपेत असताना ही चोरी झाली असून, सकाळी उठल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

या घटनेची माहिती मिळताच आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी ताफ्यासह घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे, पोलीस हवालदार महेश आहेर यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. सकाळी डॉग स्कॉडला (श्वानपथक) पाचारण करण्यात आले असून, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.दरम्यान, अद्याप याप्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यानंतरच चोरीला गेलेल्या मुद्देमालाची निश्चित आकडेवारी समोर येईल. मात्र, एकाच रात्री झालेल्या या सशस्त्र हल्ल्यांमुळे संगमनेर तालुक्याच्या पुर्व भागात भीतीचे सावट पसरले असून दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिक करत आहेत.''



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द • ख • ल

## झरेकाठी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**झरेकाठी** : येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी ग्रामस्थांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमात शिवचरित्रकार हसन एम. सय्यद यांचे व्याख्यान झाले. त्यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा घेत संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. संविधान चांगल्या लोकांच्या हातात असेल तर देश सक्षम बनेल, असे ते म्हणाले. बाबासाहेबांनी संपूर्ण मानवजातीसाठी न्याय, समता व बंधुतेचे तत्त्व दिल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सय्यद यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीही एकत्र साजऱ्या करण्याचे आवाहन करत राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला. यावेळी आश्वी पोलीस स्टेशनचे एपीआय सुधाकर शिरसाठ यांनीही अभिवादन केले. कार्यक्रमास भीम जयंती उत्सव समिती, पंचशील मित्र मंडळ, जनसेवा युवा मंचचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संध्याकाळी स्नेहभोजनानंतर भव्य मिरवणुकीने कार्यक्रमाची सांगता झाली.

## निमगाव पागा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**निमगाव पागा** : संगमनेर तालुक्यातील निमगाव पागा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पंचशील तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय दिवे यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. यासाठी विशेष उत्सव समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीत शिवनाथ भोरुंडे, राहुल भोरुंडे, रोहन दिवे, संदीप दिवे, निलेश दिवे, प्रतीक भोरुंडे, अनिल दिवे, रमेश दिवे, बाळासाहेब भोरुंडे, गणेश भोरुंडे आदींचा समावेश होता. त्यांच्या संयुक्त प्रयत्नातून जयंती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला.

कार्यक्रमास नानासाहेब कानवडे, पोलीस पाटील राजेंद्र कानवडे, सरपंच सोमनाथ कानवडे, उपसरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संतोष दिवे व दिलीप भोरुंडे यांनी मार्गदर्शन केले. गावातील अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य करत कार्यक्रम यशस्वी केला. एकजुटीने साजऱ्या झालेल्या या जयंतीमुळे सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.

## अजितदादा पवार पॉलिटेक्निकच्या ७६ विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंट

**श्रीरामपूर** : वडाळा महादेव येथील अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकने कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल ७६ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी मिळवून दिली आहे. पुणे येथील Tata AutoComp Systems तसेच छत्रपती संभाजीनगर येथील Pace Digitek या कंपन्यांनी कॅम्पस मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली. मेकॅनिकल अभियांत्रिकी शाखेतील ४१, इलेक्ट्रिकल शाखेतील २० आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखेतील १३ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत निवड मिळवली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी २.२२ लाख वार्षिक पॅकेज देण्यात आले असून पेस डिजिटेकमध्ये दोन विद्यार्थ्यांना ३.६ लाख पॅकेजची संधी मिळाली. या यशामागे कॉलेजच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. प्रकाश जाधव यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांसाठी मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन व तांत्रिक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. कॉलेजच्या प्राचार्या पूनम बोधक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उद्योगाभिमुख शिक्षण देणे ही संस्थेची प्राथमिकता असल्याचे सांगितले.

## जुळे बंधू करण-अर्जुन जनवीर यांचा दहावी परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक




**सोनई** : सीबीसी पॅटर्न दहावी परीक्षेत संतोष जनवीर यांचे जुळे पुत्र करण व अर्जुन जनवीर यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल विविध मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पत्रकार विजय खंडागळे, प्रगतशील शेतकरी जालिंदर येळवंडे, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी चंद्रकांत आघाव, कार्यकर्ते शकील बागवान, सेवा सोसायटीचे माजी व्हा. चेअरमन राजेंद्र जनवीर, माजी मुख्याध्यापिका सरोजणी जनवीर, व्यावसायिक निखिल बंग तसेच आई सरोज जनवीर उपस्थित होते.

यावेळी जालिंदर येळवंडे म्हणाले, जीवनात यश मिळवायचे असेल तर बाजी प्रभूंसारखी जिद्द आवश्यक असते. करण व अर्जुन यांनी आपल्या मेहनत व चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले आहे.या यशामुळे जनवीर कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण असून दोन्ही विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# गोंधवणी परिसरात बिबट्याचा धुमाकूळ; पाळीव कुत्री फस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून बिबट्याने धुमाकूळ घातल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक स्थळ असलेल्या भैरवनाथ बन परिसरासह दिघे वस्ती येथे बिबट्या रात्री दबा धरून बसत असून पाळीव प्राण्यांवर हल्ले करत आहे. भैरवनाथ बन शेजारील बर्वे वस्तीमध्ये चार-पाच दिवसांत दोन ते तीन पाळीव कुत्री बिबट्याने फस्त केल्याची घटना घडली आहे.



या भागात मोठी वस्ती असून गाई, म्हशी, घोडे, शेळ्या-बोकड यांसारखे पाळीव प्राणी मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे नागरिकांसह शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने रात्रीची भीती अधिक वाढली आहे. दिघे वस्ती परिसरातही बिबट्याच्या हालचाली वाढल्या असून नागरिक सतर्क झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दिघे, चांगदेव महाराज लबडे, विलास मस्के, गोरक्षनाथ बर्वे, रमेश बर्वे, सचिन सूर्यवंशी, सुरेश गोराणे, धोंडीराम लबडे आदींनी वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# शिक्षणातून बाबासाहेबांचे विचार कृतीत आणा : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**प्रवरानगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे जतन करत शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधा आणि त्यांच्या शिकवणीचे कृतीत रूपांतर करा, असे आवाहन माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी केले. लोणी येथील जनसेवा मंडळ आणि टायगर ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने बाबासाहेबांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी सरपंच कल्पना मैड, अनिल विखे, टायगर ग्रुपचे अध्यक्ष अण्णा ब्राह्मणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आपल्या भाषणात विखे यांनी जयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या शिधावाटप व शालेय साहित्य वितरण उपक्रमाचे कौतुक केले. डीजे संस्कृतीला फाटा देत समाजोपयोगी उपक्रम राबविणे ही खरी बाबासाहेबांना आदरांजली आहे, असे त्यांनी नमूद केले. त्या पुढे म्हणाल्या की, जातीपातीच्या पलीकडे जाऊन सामाजिक एकोपा टिकवणे आवश्यक आहे. शिक्षणातून घडणारे सामाजिक परिवर्तनच देशाच्या प्रगतीचा पाया आहे.

जयंती साजरी करताना बाबासाहेबांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

# कांद्याला कवडीमोल दर

## उत्पादन खर्चही निघेना, शेतकरी हवालदिल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : उन्हाळी कांदा काढणीचा हंगाम सुरू असतानाच बाजारात मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. मोठ्या कष्टाने व खर्च करून घेतलेल्या पिकाला सध्या केवळ ५०० ते ७०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. एक एकर कांदा पिकवण्यासाठी सुमारे ६५ ते ७० हजार रुपये खर्च येतो. यात बियाणे, खते, मशागत, फवारणी व मजुरीचा समावेश आहे. मात्र, मिळणारा दर अत्यल्प असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती आहे. लागवडीसाठी सुमारे १५ हजार तर काढणीसाठीही तेवढाच मजुरी खर्च करावा लागत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे बियाण्यांचे नुकसान होऊन अनेकांना दुबार पेरणी करावी लागली. आता उत्पादन हाती आले असताना बाजारभाव कोसळल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. बहुतांश शेतकरी कांदा चाळीत साठवून भविष्यात दर वाढतील, या आशेवर थांबले आहेत; तर काहींना तोट्यात विक्री करावी लागत आहे. २००५ साली मिळणारा दर आजही कायम आहे, अशी खंत संतोष पटारे यांनी व्यक्त केली. दरम्यान, हमीभावाबाबत ठोस निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक संकट अधिकच गडद होत असल्याचे चित्र आहे.

# बेलापूर-श्रीरामपूर रस्त्यावरील झाडांना 'जीवदान'

## ग्रामपंचायत व स्वयंसेवींचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : बेलापूर-श्रीरामपूर रस्त्याच्या दुभाजकात लावलेली झाडे पाण्याअभावी वाळत चालल्याने अखेर बेलापूर बु. ग्रामपंचायत, 'सत्यमेव जयते' ग्रुप आणि वर्गणीदारांच्या सहकार्याने तिसऱ्यांदा पाणी देऊन त्यांना जीवदान देण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्त्याच्या चौपदरीकरणानंतर दुभाजकात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले होते. मात्र, उन्हाळ्याच्या तीव्रतेत



पाणीपुरवठा न झाल्याने झाडांची दयनीय अवस्था झाली होती. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने स्थानिकांनी पुढाकार घेतला. संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे व पत्रकार देविदास देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीच्या टँकरद्वारे तसेच खाजगी टँकरच्या मदतीने पाणीपुरवठा करण्यात आला.

या उपक्रमासाठी अभय बंगाळ, सुनील अनाप, दिपक निंबाळकर, रवी खोडाळ आदींनी आर्थिक सहकार्य केले. ग्रामपंचायत कर्मचारी व स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष श्रमदान करत झाडांची निगा राखली. पुढील काळातही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा वृक्षप्रेमींनी दिला आहे.

# संतांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य

## विकास लवांडेचा निषेध, कारवाईची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : संत-महंतांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी विकास लवांडे यांचा श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. संबंधितांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी देवगाव, भेंडा व देवगड येथील भक्त परिवारांनी केली आहे. या संदर्भात नेवासा तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, लवांडे यांनी पत्रकार परिषद व सोशल मीडियाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायातील संत-महंतांविषयी अवमानकारक शब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे समाजात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. देवगड देवस्थानचे महंत भास्करगिरीजी बाबा यांच्यासह इतर संतांबाबत विनाधार आरोप केल्याने धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधितावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला. निवेदन देताना श्रीराम सेवा मंडळ तसेच विविध गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निळवंडे धरण व कालवे पूर्ण करून सर्वांना पाणी देणे हेच ध्येय : बाळासाहेब थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : निळवंडे धरण व दोन्ही कालवे पूर्ण करून दुष्काळी भागातील प्रत्येक शेतकऱ्याला पाणी पोहोचवणे हे माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. संगमनेर तालुका युवक काँग्रेस व एनएसयूआयच्या 'युवा संगम' कार्यक्रमात त्यांनी तरुणांशी संवाद साधत विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. थोरात म्हणाले, सातत्यपूर्ण कामामुळे संगमनेर तालुक्याची सज्जन व विकसित तालुका अशी ओळख निर्माण झाली आहे.

निळवंडे धरण, शहरासाठी थेट पाईपलाईन योजना, काकडी विमानतळ, प्रस्तावित नाशिक-पुणे रेल्वे, सक्षम सहकारी व शैक्षणिक संस्था यांमुळे तालुक्याची प्रगती साध्य झाली. विद्यार्थीदशेत विविध आंदोलनांत सक्रिय सहभाग घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी निळवंडे प्रकल्पासाठी केलेल्या पाठपुराव्याचा आढावा घेतला.

१९९२ मध्ये सुरू झालेल्या प्रकल्पाला अनेक अडचणींवर मात करत २०१२ मध्ये पूर्णत्वास नेल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या राजकारणात जातीयता वाढल्याची खंत व्यक्त करत, राजकारण हे जनतेच्या विकासासाठी असावे, असे ते म्हणाले. तरुणांनी विकासाची परंपरा पुढे नेण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोशल मीडियावरील जाहिरातींवर विश्वास ठेवू नका : डॉ. राजेंद्र हिले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कंत्राटी पदभरतीबाबत समाज माध्यमांवर पसरत असलेल्या दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन डॉ. राजेंद्र हिले यांनी केले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी अर्थशास्त्र विभागात बहुव्यापक योजनेअंतर्गत फेब्रुवारी महिन्यात कंत्राटी पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, राहुरी विधानसभा मतदारसंघातील आचारसंहितेमुळे ही प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली असून आचारसंहिता उठल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू होणार आहे. यासंदर्भातील सुधारित पत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दरम्यान, काही सोशल मीडियावर ही भरती कायमस्वरूपी असल्याचा तसेच सर्व अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावले जाणार असल्याचा चुकीचा प्रचार केला जात आहे. प्रत्यक्षात उमेदवारांची निवड शैक्षणिक पात्रता, अनुभव व कामगिरीच्या आधारे छाननी करून १:३ प्रमाणात मुलाखतीसाठी बोलावण्यात येणार आहे. या चुकीच्या माहितीमुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने अधिकृत संकेतस्थळावरील माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'दत्तधाम'च्या भोंदूगिरीचा पर्दाफाश

## वडगाव पान येथील 'महाराज'वर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे 'दत्तधाम सरकार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या राजेंद्र बापू गडगे याच्याविरुद्ध अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून दैवी शक्तीच्या नावाखाली लोकांची आर्थिक, मानसिक व शारीरिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. फिर्यादीनुसार, गडगे हा कर्करोगासारखे आजार मंत्राने बरे करणे, निपुत्रिक महिलांना अपत्यप्राप्ती करून देणे तसेच कौटुंबिक समस्या दूर करण्याचे खोटे दावे करत होता.

या माध्यमातून तो ११ हजार ते ५१ हजार रुपयांपर्यंत रक्कम उकळत असल्याचे समोर आले आहे. गेल्या ८ ते १० वर्षांत कोट्यवधींची लूट केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी गडगेसह डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे, सुरज शिंदे व मधुकर शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गडगे व मधुकर शिंदे यांना अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे करत आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती च्या पाठपुराव्यानंतर ही कारवाई झाली आहे. या घटनेमुळे अंधश्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीवर कठोर कारवाईची मागणी पुन्हा जोर धरत आहे.

# अखेर पाणीटंचाईवर उपाय; बुळे पठारावर टँकरने पाणीपुरवठा सुरू

## दै.राष्ट्र सह्याद्री बातमीचा इफेक्ट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील चिखलठाण येथील बुळे पठार परिसरातील आदिवासी वाड्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत होती.

पिण्याच्या पाण्यासाठी महिलांसह ग्रामस्थांना दूरवर भटकंती करावी लागत होती. मात्र, या गंभीर परिस्थितीची दखल घेत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. दैनिक 'राष्ट्र सह्याद्री'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल घेत पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाने तत्परतेने कारवाई केली.

पाणीपुरवठा शाखेचे अभियंता परदेश साहेब तसेच ग्रामसेवक कवटे भाऊसाहेब यांच्या पुढाकारामुळे हा निर्णय अमलात आला. टँकरद्वारे प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचविण्यात येत असल्याने आदिवासी बांधवांची पाण्यासाठीची वनवण थांबली असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानत पावसाळा येईपर्यंत नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. या कारवाईमुळे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद तसेच स्थानिक प्रशासनाच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र दुधवडे, रघुनाथ बुळे यांच्यासह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, (१) श्री. सचिन शामलाल मेहेर (२) सौ. अनिता सचिन मेहेर (३) श्री. सचिन शामलाल मेहेर (यापुढे त्यांचा उल्लेख कर्जदार असा केला आहे) यांनी आमचे अशील फेडबँक फायनाशियल सर्विसेस लिमिटेड, शाखा श्रीरामपूर, यांच्याकडे गृहकर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जदार यांनी खालील परीशिष्टामधील नमुद मिळकत (या पुढे खालील परिशिष्टामधील मिळकतीचा उल्लेख 'सदर मिळकत' असा केला आहे) सदर कर्जाचे परतफेडीच्या सुरक्षेसाठी आमचे आशीलाकडे तारण गहाण ठेवण्याचे मान्य केले आहे.

तरी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, दिनांक २९/०९/२०११ रोजी श्री. राजेंद्र तखतमल गुगळे व सौ. राणी राजेंद्र गुगळे यांनी श्री. पुलाटे संदीप शिवाजी यांच्या लाभात दुय्यम निबंधक नेवासा येथे कायम खरेदीखत दस्त क्रमांक ४५४१/२०११ नोंदविलेला आहे. तसेच सदरचे खरेदीखत दस्त, सूची २ व आर आर पावतीसह श्री. सचिन शामलाल मेहेर यांचेकडून दिनांक १०/१२/२०२५ रोजी राहुरी बस स्थानक परिसरातून गहाळ झालेले आहे. तसेच सदर मिळकत अथवा सदर मिळकतीच्या कोणत्याही हिस्स्या विरुध्द अथवा बाबत कोणाचाही खरेदीखत, साठेखत, आदला-बदल, तारण, गहाण, एक्रिटेबल किंवा नोंदणीकृत, भेट, दान, ट्रस्ट, वारस, काँटुंबिक व्यवस्था, पोटगी, इच्छापत्र, भागीदारी, ताबा, लीज, लायसेन्स, लीन, बोजा, तेज, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, कुळ, इझमेंट, वहिवाट, वगैरे अधथा अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही हक्क, अधिकार, हित-संबंध वगैरे दावा असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखे पासून ७ (सात) दिवसांच्या आत म्हणजेच दि. २५/०४/२०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आम्हास दिलेल्या पत्त्यावर आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह कळवावे, संबंधितांनी तसे न केल्यास त्यांची या संदर्भात कोणतीही हरकत / म्हणणे नसून त्यांनी त्यांचा सदर मिळकती मधील हक्क, अधिकार, हित-संबंध वगैरे दावा स्वतःहून सोडून दिला असल्याचे समजण्यात येईल आणि आमचे अशिल सदर मिळकत तारण गहाण घेउन कर्जदार यांना कर्जाची रकम वितरीत करतील.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णनः जिल्हा अहिल्यानगर, तालुका व तुकडी नेवासा पैकी व मौजे सोनई येथील व सोनई ग्रामपंचायत हद्दीतील व सिटी सर्व्हे हद्दीतील मिळकत यासी सिटी सर्व्हे नंबर १८८२ पैकी, ग्रामपंचायत मिळकत नं. ५५८/३ (१+२) १२, तिरुपती आयडल पार्क एरिया ए दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं. १२, बांधीव क्षेत्र ४५.१५ चौरस मीटर., यासी रेकोर्डप्रमाणे चतुः सिमा पूर्वक असलेली संपूर्ण मिळकत,

दिनांकः १८/०४/२०२६
श्रीरामपूर

शिक्का

**अ‍ॅड. विनोद दिनकर तोरणे**
**पत्ताः ०६, मिनी स्टेडियम**
**श्रीरामपूर, जि. अहमदनगर**
**मो. नं. ९२२६२६३३४३**

## जाहीर प्रकटन

तमाम लोकांस जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की मौजे श्रीरामपूर तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथील रहिवासी कै. संपत पन्नालाल खटोड हे दिनांक १७/०९/२०२४ रोजी श्रीरामपूर येथे मयत झालेले आहेत मयत कै. संपत पन्नालाल खटोड यांच्या पत्नी प्रेमाबाई संपत खटोड ह्या वारस आहेत. मयतास वर नमूद वारसा पैकी अन्य कोणीही वारस नाही कै. संपत पन्नालाल खटोड यांच्या नावे टोयोटा कंपनीची टोयोटा जीप MH12NE3370 चेसी नं. 2NRD116914D116914 इंजिन नं. MBJB29BT8001072690516 पेट्रोल गाडी सदर टोयोटो गाडी कै. संपत पन्नालाल कटोरी यांच्या पत्नी प्रेमावर संपत खटोड यांचे नावे आरसी बुक सदरी करणे आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय श्रीरामपूर येथे कार्यवाही चालू केली आहे. सदर टोयोटो वाहनसंदर्भात कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत किंवा हितसंबंध असल्यास सदर इस्मानी कागदपत्र पुराव्यानिशी प्रादेशिक परिवहन कार्यालय श्रीरामपूर येथे हरकत नोटीस प्रसिद्ध झाली पासून सात दिवसाच्या आत हरकत नोंदवायचे आहे मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नोंदवली जाणार नाही त्यानंतर कुणाची कुठली तक्रार अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक हक्क सोडुन दिले आहे. असे समजण्यात येईल सदर वारस कै. संपत पन्नालाल खटोड यांच्या पत्नी प्रेमाबाई संपत खटोड यांच्या नावे ट्रान्सफर करण्यात येईल.

**ही जाहीर नोटीस श्रीरामपूर**
**संपर्क श्री राम मंदिर रोड श्रीरामपूर**
**९९७०१२११३६**

ADV.Vaibhav R.Khandagle
B.S.L.LL
Reg No.MAH/1751/2021
At.Belapur Tal.Shrirampur, Dist.A.Nagar
Mob : 9595358703/9885222765

# ‘टकमक टोक’वरुन थेट आव्हान; खुणे-जरांगे वाद अधिक चिघळला



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड** : मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे-पाटील आणि अमोल खुणे यांच्यातील वाद दिवसेंदिवस तीव्र होत असून, आरोप-प्रत्यारोपांनी वातावरण तापले आहे. जरांगे-पाटील यांनी आपल्या हत्येची सुपारी दिल्याचा गंभीर आरोप खुणे यांच्यावर केल्यानंतर खुणे यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत थेट आव्हान दिले आहे.

रायगड किल्ल्यावर असलेल्या ऐतिहासिक टकमक टोकचा संदर्भ देत खुणे म्हणाले, जर मी खरंच सुपारी घेतली असेल, तर माझा कडेलोट टकमक टोकावरून करावा. मात्र, मी निर्दोष ठरलो, तर मनोज जरांगे-पाटील यांनीही त्याच प्रकारची शिक्षा स्वीकारावी. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

खुणे यांनी पुढे सांगितले की, माझ्याविरोधात काही आमदार आणि खासदारांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्र देत कारवाईची मागणी केली होती. आता त्याच लोकांनी जरांगे-पाटील यांच्या विरोधात नार्को टेस्ट तसेच स्वतंत्र चौकशीची मागणी करावी. यावरून त्यांनी आपल्या विरोधातील कारवाईवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जरांगे-पाटील यांच्या आरोपांवर पलटवार करत खुणे म्हणाले, कोणावरही बिनबुडाचे आरोप करणे योग्य नाही. आरोप करताना जबाबदारीने बोलले पाहिजे. मी सत्याच्या बाजूने उभा आहे आणि समाजात फूट पाडण्याचे काम करणार नाही. तसेच, जातीय भावना भडकवून तरुणांना चुकीच्या मार्गावर नेऊ नका, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, या वादामुळे मराठा आंदोलनातील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर येत आहेत. दोन्ही बाजूंनी होत असलेल्या तीव्र वक्तव्यांमुळे कार्यकर्त्यांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या काळात या प्रकरणाची चौकशी किंवा राजकीय पातळीवर हस्तक्षेप होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, खुणे-जरांगे वाद आणखी उग्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# तीन महिन्यात उभा राहणार बाबासाहेबांचा भव्य पुतळा

## डॉ. सुजय विखे यांचा श्रीरामपूरकरांना शब्द

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येत्या तीन महिन्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पूर्णआकृती पुतळा उभा करू, असा शब्द भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी श्रीरामपूरकर यांना दिला. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीच्यावतीने ’समाज भूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले.

डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेबांच्या स्मारकावरून सुरू असलेल्या श्रेयावादाचा देखील आपल्या अनोख्या शैलीतुन समाचार घेतला. यावेळी पुतळा उभारणीच्या कामावरून होत असलेल्या राजकारणावर डॉ. विखे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ‘‘यामध्ये कोणीही श्रेयावादाची लढाई करू नये. समाज बांधवांसह आजी-माजी लोकप्रतिनिधींचे नाव घेऊन त्यांचेदेखील या पूर्णआकृती स्मारक उभारणीत मोठे योगदान आहे. जे काम शिल्लक राहिले आहे, त्यात आमचा खारीचा वाटा असेल. निदान महामानवांना तरी राजकारणाच्या कक्षेबाहेर ठेवा,‘‘ अशी विनंती त्यांनी श्रीरामपूरमधील राजकारण्यांना केली. श्रीरामपूरात उभारले जात असलेले भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक हे केवळ एक पुतळा नसून ती बाबासाहेबांप्रती असलेली आस्था असेल, असे सांगताना ते म्हणाले, ‘‘हा पुतळा असा देखणा आणि भव्य असेल की, जो कोणी श्रीरामपूरमधून जाईल, त्याच्या मनात बाबासाहेबांबद्दलची निष्ठा अधिक बळकट होईल. आमचा उद्देश स्वच्छ आहे – बाबासाहेबांच्या कार्याला शोभेल असे भव्य स्मारक उभे करणे, हीच आमची प्राथमिकता आहे.‘‘



पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, ‘‘पुरस्कार लहान किंवा मोठा नसतो, देणाऱ्याचे मन पाहून मी कार्यक्रमाला येतो. आज मी इथे पुरस्कार घेण्यासाठी नाही, तर स्मारक समितीने जो पुढाकार घेतला आहे, त्यांचे आभार मानण्यासाठी आलो असल्याचे सांगितले.श्रीरामपूर येथे संपन्न झालेल्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार सोहळ्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णआकृती पुतळा स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांसह भाजपचे उपजिल्हाध्यक्ष दीपक पटारे, भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, नगरसेवक श्रीनिवास बिहाणी, माजी नगराध्यक्ष संजय फंड, नाना शिंदे, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक संजय गांगड, रवी पाटील, आशिष धनवटे, मनोज लबडे ,तिलक डुंगरवाल, केतन खोरे, शरद नवले, डॉ शंकर मुठे, भीमराज बागुल, नगरसेवक सिद्धार्थ फंड, रुपेश हरकल आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील लोणी खुर्द येथे विहिरीत बुडून एका ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी दुपारी उघडकीस आली. पंकज सुभाष चोळके (रा. मोरझर, ता. नांदगाव, जि. नाशिक) असे मृताचे नाव आहे. लोणी खुर्द येथील प्रभाकर रामभाऊ जाधव यांच्या चिकटगाव रोडवरील विहिरीत एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह तरंगताना ग्रामस्थांना दिसून आला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी मृतदेह विहिरीबाहेर काढला. तो पंकज सुभाष चोळके यांचा असल्याचे स्पष्ट झाले. मृत पंकज चोळके याचे चुलत मामा भागवत उत्तमराव सोनवणे (रा. वाकला, ता. वैजापूर) यांनी ओळख पटवली. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शिऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला. तिथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून मृत घोषित केले. प्राथमिक अंदाजानुसार, विहिरीत पाय घसरून पडल्याने बुडून पंकजचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज आहे. या प्रकरणी शिऊर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पुणतांब्यात पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनचे काम सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत तलावातून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाला सुरुवात झाली असून सध्या चौधरी वस्तीपर्यंत खोदाई व पाईप टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

नवीन पाईपलाईनमुळे पाणीपुरवठा सुधारण्याची अपेक्षा व्यक्त होत असली तरी तलावातील पाणी साठवण क्षमतेची मर्यादा लक्षात घेता भविष्यातही पाणीटंचाई कायम राहण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. जलस्वराज्य टप्पा-२ व जलजीवन योजनेअंतर्गत सुमारे ३२ कोटी रुपयांच्या योजना मंजूर झाल्या असल्याम तरी त्यांची कामे अद्याप अपूर्ण आहेत.अनेक वाड्या-वस्त्यांपर्यंत पाईपलाईन पोहोचलेली नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पाणीप्रश्नाबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण



आहे.पाणीपुरवठा योजना लवकर पूर्ण करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

# जमीन व्यवहारात ९६ लाखांची फसवणूक; पाच जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:** जमीन खरेदीच्या व्यवहारात तब्बल ९६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गंगापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सय्यद अजिजोद्दीन सय्यद (रा. छत्रपती संभाजीनगर) यांनी तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, सौरभ साबणे, आशीष साबणे (दोघे रा. गंगापूर) व नसीर खान पठाण (रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्यासह अन्य संबंधितांनी गंगापूर येथील आंबेवाडी परिसरातील सुमारे ६ हेक्टर ९८ आर जमीन विक्रीस असल्याचे सांगत व्यवहार ठरवला.

नोव्हेंबर २०२५ मध्ये २ कोटी २७ लाख ५० हजार रुपयांत व्यवहार निश्चित झाला. त्यानुसार फिर्यादीकडून विविध टप्प्यांत बँक व रोख स्वरूपात मोठी रक्कम देण्यात आली. मात्र, ठरल्याप्रमाणे जमीन नावावर करून न देता आरोपींनी टाळाटाळ केली.

चौकशीत संबंधितांनी याच जमिनीचा यापूर्वीही इतर व्यक्तींशी व्यवहार करून त्यांच्याकडूनही रक्कम घेतल्याचे समोर आले आहे. अशा प्रकारे एकूण ९६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी गंगापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# बालविवाह आढळल्यास तुरुंगवारीमदत करणारेही अडचणीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : बालविवाह होत असल्याचे किंवा झाल्याचे आढळल्यास संबधितांविरूद्ध गुन्हे दाखल होऊन त्यांना तुरूंगाची हवा खावी लागणार आहे. याबाबत सर्व संबंधितांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ तसेच बालविकास प्रकल्पाधिकारी शोभा शिंदे यांनी पत्रकाद्वरे केले आहे.

बालविवाह ही एक अनिष्ट प्रथा आहे. बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ तयार करण्यात आलेला आहे. हा अधिनियम एक नोव्हेंबर २००७ पासून अंमलात आलेला आहे. सदर अधिनियमाद्वरे बालविवाह हा एक अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह करणाऱ्या किंवा बालविवाहात सामील होणाऱ्या व्यक्तीस दोन वर्षापर्यंत सक्तमजुरी तसेच एक लाख रुपये पर्यंत दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षयतृतीया आहे. या दिवशी भारतातील काही भागात मोठ्या प्रमाणात विवाह आयोजित केले जातात. यावेळी बालविवाह सुद्धा मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर दिवशी श्रीरामपूर तालुक्यात कोठेही बाल विवाह होणार नाही याबाबतची दक्षता सर्व नागरिकांनी घ्यावी.

श्रीरामपूर तालुक्यातील कुठल्याही ठिकाणी बालविवाह होत असल्याबाबत आपल्या निदर्शनास आल्यास याबाबत तात्काळ पोलीस प्रशासन, महिला व बालविकास विभाग पंचायत समिती श्रीरामपूर, ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, सरपंच, नगराध्यक्ष, नगरसेवक यांच्यामार्फत शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे किंवा चाइल्ड हेल्पलाईन क्रमांक १०९८ यावर तक्रार करावी, असे आवाहन तहसीलदार वाघ व बालविकास प्रकल्पाधिकारी शोभा शिंदे यांनी केले आहे.

# श्रीरामपुरात गावरान कांदा भाव १३००

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला १३०० रुपये बाजारभाव जाहीर झाला असून काल गावरान कांदा २९७६ गोण्यांची आवक झाली आहे, कालपेक्षा आवक काहीशी वाढ झाली असून भाव मात्र स्थिर आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली. श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत काल २९७६ गोण्यांची आवक झाली असून कांदा नंबर एक – १०५० ते १३०० , कांदा नंबर दोन – ७५० ते १०००, कांदा नंबर तीन – ५०० ते ७००, गोल्टी – ४०० ते ९००, खाद – २०० ते ५०० असे भाव जाहीर झाले असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.



# संताविषयी केलेल्या वक्तव्याचा मुस्लिम समाजाकडून निषेध

**नेवासा** : शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे विलास लवांडेने संताविषयी केलेल्या वक्तव्याचा मुस्लिम समाजाकडून निषेध करण्यात आला असून सदर व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.देवगडच्या गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांनी आतापर्यंत एकोप्यासाठीच प्रयत्न केले असून इतर धर्मियांबाबत कधी ही चुकीचे वक्तव्य केले नसल्याचे मुस्लिम समाजाचे युवा नेते इम्रानभाई दारुवाले यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या निवेदनात इम्रानभाई दारूवाले यांनी म्हटले आहे की दिनांक १६/०४/२०२६ रोजी विलास लवांडे नामक व्यक्तीने महाराष्ट्रातील जुनी परंपरा असलेला वारकरी संप्रदायातील संत महंतांवर वारकरी संप्रदायात घुसखोरी केली असल्याचे संतापजनक वक्तव्य केले आहे या वक्तव्याचा आम्ही जाहीर निषेध करीत आहोत. त्यामध्ये नेवासा तालुक्यातील श्री.क्षेत्र देवगड येथील महंत श्री भास्करगिरीजी महाराज यांचे ही नाव त्यात घेण्यात आलेले आहे.नेवासा तालुक्यामध्ये गेली कित्येक वर्ष पिढयान पिढया हिंदू-मुस्लीम बांधव एकोप्याने राहत असून गेली ३०-४० वर्षामध्ये आम्ही महंत भास्करगिरीजी महाराज यांना पहात असून त्यांचे कीर्तन व संवाद ऐकत आलेलो आहोत. त्यांनी त्यांच्या कारकीर्दीमध्ये कधीही मुस्लीम समाज किवा अन्य धर्मियाबाबत कधीही चुकीचे वक्तव्य केलेले ऐकवत नाही. त्यांनी सदैव एकोपा ठेवण्याचे काम आजपर्यंत केलेले आहे. तरी ही विलास लवांडे नामक या व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी इम्रानभाई दारूवाले यांनी केली आहे. निवेदनावर शेकडो मुस्लिम बांधवांच्या सहया असून निवेदन देतेवेळी युवा नेते इम्रानभाई दारूवाले यांच्या समवेत माजी नगरसेवक अल्ताफभाई पठाण,अँड. सादिक शिलेदार,अँड.राजू इनामदार,करीम सय्यद,इम्रान पटेल,समीर इनामदार,सुलतान शेख,नासिर इनामदार, आयाज पठाण,अशपाक जहागिरदार,दादा देशमुख, इलियास देशमुख,समीर सय्यद उपस्थित होते.




# भर उन्हात गाडी थांबवून उदयन गडाख यांनी शालेय विद्यार्थ्यांशी साधला संवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : संपूर्ण महाराष्ट्रात तसेच नेवासा तालुक्यात उन्हाचा कहर असताना उष्णतेचा पारा ४०ओ पार गेले असतानाही बेलपिंपळगाव येथे शालेय विद्यार्थी हे भर उन्हामध्ये तळमळीने शाळेत जात होते याच वेळी तेथून युवा नेते उदयन गडाख हे बिलपिंपळगाव चा दौरा करत होते . तेव्हा उदयन गडाख यांची भर भर उन्हामध्ये शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडे नजर गेली लागलीच त्यांनी आपला ताफा थांबवून विद्यार्थ्यांना मायेने जवळ घेतले.

व त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला उदयन दादा यांनी विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न केले आणि विद्यार्थ्यांनीही त्यांच्याशी अगदी मनमोकळा संवाद साधला उदयन दादांशी बोलताना कुठलीही मनात भीती



न बाळगता विश्वासाने उत्तरे देताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसत होते.

युवा नेते उदयन दादा गडाख यांनी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांबद्दल , शिक्षणांबद्दल व त्यांच्या भविष्याबद्दल त्यांनी घेतलेली आस्था मनाला अगदी भिडणारी होती. यात मायेचा ओलावा स्पष्ट दिसत होता तसेच या विद्यार्थ्यांना त्यांनी भविष्यात काय करावे याचेही मार्गदर्शन केले . हा संवाद फक्त राजकारणापुरता मर्यादित नव्हता तर तो होता नात्यांचा, जिव्हाळ्याचा आणि प्रेरणेचे नाते राजकारणात पलीकडचे याची प्रचिती पुन्हा एकदा उपस्थित सर्वांना आली. अशाच क्षणांमधून भविष्यातील पिढीला योग्य दिशा आणि आत्मविश्वास मिळतो

युवा नेते उदयन दादा गडाख आणि या विद्यार्थ्यांच्या भेटीने संपूर्ण नेवासा तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

# शिरसगाव येथे एसटी डिजिटल कार्ड सुविधा केंद्र प्रारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव:** महाराष्ट्र राज्य सरकारने राज्य परिवहन बसेससाठी एनसीएमसी डिजिटल कार्ड देण्याची सुविधा प्रत्येक बस आगार येथे सुरु केली आहे. त्यासाठी तेथे कायम गर्दी होते.तालुक्यातून दुरून महिला पुरुष जेष्ठ नागरिक येत असतात.कसेतरी आधार कार्ड व मोबाईल क्रमांक दाखवून नोंदणी केले जाते.व कार्ड महिन्यांनी मिळेल असे सांगितले जाते.

आता श्रीरामपूर येथील गर्दी टाळण्यासाठी एस टी विभागाकडून गावोगावी सदर सुविधा उपलब्ध केली त्याप्रमाणे शनिवारी शिरसगाव येथे श्री बाल संन्यासी हरीबाबा महिला ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्थावतीने ही सुविधा उपलब्ध केली असून त्याचा परिसरातील जेष्ठ नागरिक यांनी लाभ घेतला..या एसटी कार्ड सुविधा केंद्राचा शुभारंभ योगी माणिकनाथ महाराज व माजी तालुकाध्यक्ष संजय गांधी निराधार योजना गणेशराव मुदगुले व पतसंस्था चेअरमन छाया जगताप यांच्या हस्ते शुभारंभ झाला. त्यावेळी व्हा चेअरमन ज्योती ताके,संचालक मनीषा मुदगुले,सचिव सौं सुनीता बनसोडे मनीषा जाधव,समिना शेख,सलमा शेख,,मयुरी गवारे,राजश्री वाघ,अर्चना यादव,अर्चना मोरे रेणुका गवारे,अशोक पवार,सुभाष गवारे,लक्ष्मण यादव उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name **Yashmin Babu Shaikh** (Name As Per School Documents) To New Name As **Yasmeen Babu Shaikh** Vide Aadhar No. 4946 3894 5509

**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name **Syed Sultana Begum Syed Jafar** (Name Before Marriage) To New Name As **Sultana Mushtak Tamboli** (Name After Marriage) Vide Aadhar No.9922 8161 7314

# ओढ्या-नाल्यांसह प्रवरा डावा-उजवा कालव्यांचे नुतनीकरण करावे : खंडागळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान ‘‘पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन पंधरवाडा‘‘ संपन्न होत आहे. या कालावधीत श्रीरामपूर तालुक्यातील ओढ्या-नाल्यांचे तसेच प्रवरा डावा व उजवा कालव्यांसह अंतर्गतच्या चाऱ्या आणि वाटर कोर्सचे खोलीकरण, रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी बेलापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष भास्कर खंडागळे यांनी केली आहे.

खंडागळे यांनी सांगीतले की, राज्य शासन व जलसंपदा विभागाने दुष्काळमुक्त अहिल्यानगर जिल्ह्याचा निर्धार केला आहे. त्यासाठी सदरचा पंधरवाडा संपन्न केला जाणार आहे. या दरम्यान ओढ्या-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण अशी जलसंवर्धनपुरक कामे करण्यात येणार आहेत. श्रीरामपूर तालुक्यातील ओढ्या-नाल्यांवर शासनाने दगडी साठवण बंधारे, मृदसंधारण अंतर्गत सिमेंट काँक्रिटचे आडवे बांध, अशोक कारखान्याने अशोक बधारे बांधले आहेत. गेली तीस वर्षे या बंधाऱ्याचे खोलीकरण व रुंदीकरण केले गेले नाही. यामुळे बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. यामुळे बंधा-यांची साठवण तसेच पाझरण्याची क्षमता घटली आहे. हे लक्षात घेता तालुक्यातील ओढ्या-नाल्यांचे नुतनीकरण गरजेचे आहे. याचबरोबर प्रवरा डावा व उजवा कालवा आणि त्याअंतर्गतच्या चाऱ्या व वाटर कोर्सेसचेही खोलिकरण,रुंदीकरण व नुतणीकरण आवश्यक आहे. तरी नमुद केलेली सदरची सदरची कामे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन पंधरवाड्यात युध्दपातळीवर केली जावी, अशी मागणी श्री. खंडागळे यांनी केली आहे.

# २७ एप्रिलपासून कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा बेमुदत बंद; शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई** : राज्यात आधीच गारपीट, सातत्याने पडणारा अवकाळी पाऊस आणि बाजारभावाच्या अस्थिरतेमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता आणखी एक मोठे संकट उभे राहिले आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी २७ एप्रिल २०२६ पासून राज्यभर बेमुदत बंदचा इशारा दिल्याने शेती हंगामाच्या तोंडावर खते, बियाणे आणि किटकनाशकांचा तुटवडा निर्माण होण्याची भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईडस् अ‍ॅण्ड सीडस् डिलर्स असोसिएशन (माफदा) यांनी शासनाच्या दुर्लक्षाविरोधात हा कठोर निर्णय घेतला आहे. संघटनेचे अध्यक्ष विनोद तराळ पाटील आणि महासचिव विपीन कासलीवाल यांनी सांगितले की, मागील चार-पाच वर्षांपासून विविध प्रलंबित प्रश्नांवर शासनाकडे पाठपुरावा करूनही कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

विक्रेत्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये खत पुरवठ्यातील ‘लिंकींग’ पद्धत रद्द करणे,अवैध व्हढढ कपाशी बियाण्यांवर बंदी, ‘साथी’ पोर्टलचा मर्यादित वापर, खत पुरवठा ‘ऋजठ’ पद्धतीने करणे आणि विक्री मार्जिन वाढवणे यांचा समावेश आहे. तसेच बियाण्यांचे नमुने फेल झाल्यास विक्रेत्यांना आरोपी न ठरवता साक्षीदार मानावे, प्रलंबित रकमा तातडीने द्याव्यात आणि अवैध किटकनाशक विक्रीवर नियंत्रण ठेवावे, अशा विविध मागण्याही करण्यात आल्या आहेत. संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, पुढील आठ दिवसांत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २७ एप्रिलपासून राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बेमुदत बंद ठेवण्यात येतील.या संभाव्य बंदमुळे शेतकऱ्यांना वेळेवर खते, बियाणे व किटकनाशके उपलब्ध होणार नाहीत.आधीच गारपीट व कमी बाजारभावामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर हा आणखी एक मोठा आघात ठरू शकतो.दरम्यान, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून हा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा शेतकरी आणि विक्रेते दोघांनाही मोठा आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## नशिबाची परिक्षा

रविवार दि .१९ एप्रिल २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १८० २७० ९०० | ९-१ | १४६ १२८ ११९ | ३१-२४-५७ १८-९० |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १९० १४५ ११८ | ०-६ | १२३ १५० ११४ | ०३-२६-४५ १९-६७ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| २६० ३५० ११६ | ८-९ | १२६ १८० ११७ | ८१-५९-७४ २०-९६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द•ख•ल

### गरडवाडी येथे रानडुक्कराच्या हल्ल्यात महिला जखमी

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील गरडवाडी शिवारामध्ये ढोरजळगांव ग्रुप ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच रानडुक्कराच्या हल्यामध्ये जखमी झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी ५ वा घडली . सविस्तर वृत्त असे की गरडवाडी येथील माजी सरपंच या आपल्या शेतामध्ये खुरपणी करत असताना अचानक उसामधुन भरधाव वेगाने आलेल्या रानडुक्कराने जोराची धडक दिल्याने हाताला पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने रानटी प्राणी पिण्याच्या पाण्याच्या शोधामध्ये भर दिवसा उन्हा तान्हात भटकंती करताना दिसुन येत आसुन त्यामुळे शेतामध्ये काम करणा-या मजुरांना या हिंसक प्राण्यापासून धोका निर्माण झाला आहे. सध्या ढोरजळगांव व गरडवाडी परीसरात ऊसाची तोंडणी पुर्ण झाल्यामुळे रान डुक्करांना लपडांवासाठी जागा नसल्यामुळे इतरत्र शेतामध्ये भटकंती करताना दिसुन येत आसुन त्यामुळे शेतामध्ये काम करणाऱ्या मजुरांच्या जीवितास धोका निर्माण होत असुन वनविभागाने मोकाट पणे फिरणा-या रानडुक्करांना पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांना मधुन होत आहे.

### भीम गीतांनी पंचशील नगर दुमदुमले

**अहिल्यानगर :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरात तसेच विदेशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच अनुषंगाने भिंगार शहरातही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पंचशील नगर येथे बोधिसत्व प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांच्या भव्य भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून बौद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर भिंगार शहराचा बुलंद आवाज म्हणून ओळखले जाणारे कालकथित पँथर एकनाथ उर्फ नाथा भिंगारदिवे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. यानंतर भीम गीतांच्या कार्यक्रमास सुरुवात होताच वातावरण भारावून गेले.या कार्यक्रमासाठी वृद्ध, तरुण, महिला तसेच लहान मुलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाला ज्येष्ठ कार्यकर्ते प्रसाद भिंगारदिवे, सुदर्शन भिंगारदिवे, सुनील भिंगारदिवे, प्रा. सुहास धिवर, ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेशभाऊ बनसोडे, प्रा. जयंत गायकवाड, देशस्तंभ न्यूजचे महेश भोसले, नगरसेवक मयूर बांगरे, आरपीआयचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे सिद्धार्थ आढाव, अक्षय भिंगारदिवे, संदीप पारधे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### केडगावच्या ओएसीस स्कूलचा 'सीबीएसई'त डंका

**अहिल्यानगर :** सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन (सीबीएसई) द्वारा घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये केडगाव येथील 'ओएसीस इंग्लिश मीडियम स्कूल'ने यशाची परंपरा कायम राखली असून, शाळेच्या विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे. कु. अन्विता सुहास घिगे हिने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. आस्था राहुलकुमार शिंगवी (९३.००%)द्वितीय, तरअक्षरा संजय माळवे (९२.००%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षेसाठी पालकांचा ओढा महागड्या खासगी शिकवणीकडे असतो. मात्र, ओएसीस स्कूलच्या या गुणवंतांनी कुठलीही बाहेरील शिकवणी न लावता, केवळ शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन आणि जिद्दीच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

निकालाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कु. आस्था शिंगवी हिने इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर अक्षरा माळवे हिनेही ९९ गुण मिळवत आपले भाषिक प्रभुत्व सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास कोतकर, सचिव सचिन कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, प्राचार्या दारकुंडे मॅडम, पर्यवेक्षक शरद पवार आणि सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

**अहिल्यानगर :** तथागत बुध्दिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने शहरात मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी निशुल्क बौद्ध वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा आणि विवाह प्रक्रियेला सुलभता यावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कांबळे व वधू-वर समिती प्रमुख अशोक बागुल यांनी केले आहे. हा वधू-वर परिचय मेळावा न्यू टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजता उद्घाटन सत्रानंतर वधू-वर परिचय मेळाव्याला प्रारंभ होणार असून त्यामध्ये सहभागी युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यात येणार आहे. या मेळाव्यात बौद्ध समाजातील अविवाहित युवक-युवतींसह घटस्फोटीत तसेच विधुर व्यक्तींचीही नोंदणी केली जाणार आहे.

# पाथर्डीत 'नारीशक्ती वंदन विधेयका'बाबत जनजागृती

## महिलांना ३३% आरक्षणाचा ऐतिहासिक टप्पा : आ. मोनिका राजळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** देशाच्या राजकीय इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या 'नारीशक्ती वंदन विधेयका'च्या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यात जनजागृतीला वेग आला आहे. केंद्र सरकार विशेष अधिवेशनात हे विधेयक सादर करणार असून, हा निर्णय महिलांच्या सशक्तीकरणासाठी क्रांतिकारक ठरेल, असा ठाम विश्वास आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील माणिकदौंडी येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व समाधान शिबिराच्या प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उपस्थित नागरिकांना संबोधित करताना त्यांनी महिलांच्या राजकीय सहभागाला चालना देणाऱ्या या विधेयकाचे महत्त्व सोप्या व समजण्यासारख्या भाषेत स्पष्ट केले. तसेच या विधेयकाच्या समर्थनार्थ ठरावीक मोबाईल क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन आपला पाठिंबा



नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी प्रसाद मते होते.

प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार रवींद्र शेखटकर, दिग्विजय पाटील, किशोर सानप, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी लीलावती सोलाट, आजिनाथ आंधळे महाराज, रंगनाथ महाराज चितळे, उद्योजक आजिनाथ आव्हाड, पंचायत समितीचे माजी गटनेते सुनील ओव्हळ, अंकुश चितळे, उद्योजक बथुवेल बळीद व संपत गायकवाड आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या शिबिरात महसूल, आरोग्य, कृषी व पंचायत समितीच्या विविध विभागांमार्फत लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रलंबित प्रकरणे असलेल्या नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार तातडीने सेवा पुरवून दिल्याने शिबिराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार राजळे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे, तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राज्यभर सुरू असलेले हे अभियान अत्यंत प्रभावी ठरत आहे. जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाला अधिक गती मिळाली असून, प्रशासनाबद्दल जनतेमध्ये सकारात्मक भावना निर्माण होत आहे.

सरकारी कामकाजाची ठराविक पद्धत असल्यामुळे प्रक्रिया वेळखाऊ ठरते, मात्र नागरिकांना तातडीच्या सेवांची अपेक्षा असते. या पार्श्वभूमीवर अशा शिबिरांमुळे अधिकारी व नागरिकांमधील दरी कमी होऊन प्रशासन अधिक लोकाभिमुख बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या वर्षभरात महसूल विभागाने गतिमान व प्रभावी निर्णय घेतल्याने जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, असेही त्या म्हणाल्या.

घरकुल योजना मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी तातडीने कामे पूर्ण करावीत, अन्यथा त्यांचा हक्क रद्द होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच सध्या सुरू असलेल्या मतदार यादी पुनरनिरीक्षण मोहिमेत नागरिकांनी सहकार्य करून घरी येणाऱ्या प्रगणकांना आवश्यक माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

महिला आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के सहभाग वाढल्याने विकास प्रक्रियेत महिलांचे योगदान लक्षणीय ठरले आहे. त्याच धर्तीवर संसद व विधानसभेत महिलांना संधी मिळाल्यास अधिक सक्षम व समतोल समाज घडेल, असा विश्वास आमदार राजळे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले. सूत्रसंचालन पोलीस पाटील वसंत वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन नायब तहसीलदार रवींद्र शेखटकर यांनी मानले. मंडलाधिकारी माधुरी नामदे, तलाठी आरती गाडकर, हरिश्चंद्र नांगरे, कालीचरण मखरे, बबन क्षीरसागर व ओंकार भिंगारदिवे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## काष्टी परिसरात वन विभागाची धडाकेबाज कारवाई; आंध्रप्रदेशातील आरोपी जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी परिसरात वन्यजीवांची बेकायदेशीर शिकार करणाऱ्या टोळीवर वन विभागाने अचूक सापळा रचत दमदार कारवाई केली. खाजगी शेतकऱ्याच्या शेतात सापळा लावून रानमांजर पकडून त्याचे मांस खाणाऱ्या आंध्रप्रदेशातील आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले असून न्यायालयाने त्यांना २ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे . आंध्र प्रदेशातून श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी परिसरात रानमांजर पकडण्यासाठी आले असल्याची गोपनीय माहिती गुप्त माहितीदारांकडून मिळताच वन विभागाने अचूक सापळा रचत दमदार कारवाई केली. खाजगी शेतकऱ्याच्या शेतात सापळा लावून रानमांजर पकडून त्याचे मांस खाणाऱ्या आंध्रप्रदेशातील आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले असून न्यायालयाने त्यांना २ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे शिलाम येशू, शेडरेक अंजी, दुर्गाराव पुडमी (जि. रंगारेड्डी, आंध्रप्रदेश) अशी आहेत. ही कारवाई दि. १६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. वन विभागाच्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे शेत परिसरात सापळा रचला होता. आरोपी रानमांजर पकडून त्याचे सेवन करत असतानाच त्यांना ताब्यात घेण्यात आले. शिकार करून पोट भरायचा प्लॅन होता, पण आता कायद्याने थाळी वाढली, अशीच परिस्थिती आरोपींची झाली.पकडलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने दोन दिवसांची कोठडी सुनावली आहे.या कारवाईत रेंज फॉरेस्ट ऑफिसर दीपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक रंजना घोडके, नितीन डफडे, चंद्रकांत मरकड तसेच वनमजूर भाऊसाहेब कराळे, रतन चव्हाण, रामा पळसकर आदी कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता.त्यावेळी बोलताना वनाधिकाऱ्यांनी सांगितले आहे कि वन्यजीवांवर डोळा ठेवणाऱ्यांनी आता लक्षात ठेवावंजंगलात शिकार करायला गेलात, तर कायद्याच्या जाळ्यात अडकणं पक्कं!आहे असेही त्यांनी बोलताना सांगितले आहे.

## श्रीगोंदा येथे सामाजिक विकासाच्या नव्या उपक्रमांचे लोकार्पण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** महामानव बाबा आमटे विकास सेवा संस्था, श्रीगोंदा यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांचा लोकार्पण सोहळा अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे. घुगलवडगाव (ता. श्रीगोंदा) येथे सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम पार पडणार आहे.



या सोहळ्यात रुबिकॉन उत्कृष्टता विकास केंद्र, द्वारकाबाई गणेशा नाईक भोजनालय आणि साई स्मृती सौर ऊर्जा प्रकल्प यांचे उद्घाटन पद्मश्री डॉ. अभय बंग (डएठउक, गडचिरोली) यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महामानव बाबा आमटे विकास सेवा संस्था गेल्या १७ वर्षांपासून आदिवासी पारधी समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत आहे.

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना निवासी सुविधा, अन्न, शैक्षणिक मार्गदर्शन आणि संस्कार देत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडत असून त्यांच्या भविष्यास नवी दिशा मिळत आहे.नव्याने सुरू होणारे हे प्रकल्प शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारे ठरणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बॅकबेंचर्स देखील उच्च पदावर जाऊ शकतात : आत्माराम झरेकर




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांचा आदर, सन्मान आणि त्यांनी दिलेल्या शिकवणीचे प्रामाणिकपणे अनुकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी पहिल्या बेंचवर बसून शिक्षण घेणे आवश्यक नाही तर बॅकबेंचर्स देखील उच्च पदावर जाऊ शकतात असे प्रतिपादन आत्माराम झरेकर यांनी केले.चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम संपन्न झाला प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण या होत्या. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक अनिल मगर,अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक,संजय मरकड, शितल गोरे, वत्सला जाधव, विद्यावर्धिनी मुळे, शितल दहिवाळकर आदी मान्यवर उपस्थित होते, कार्यक्रम प्रसंगी रामेश्वर आंधळे, योगेश पोपळे,सत्यवान तेलोरे यांची नुकतीच पोलीस दलात निवड झाली. त्यांचा सन्मान व गौरव विद्यालयातर्फे यावेळी करण्यात आला. त्यांनी आपल्या मनोगतात आपल्या यशाच्या प्रवासातील अनुभव सांगत जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांचा आदर, सन्मान राखणं गरजेचं आहे.आम्ही अभ्यासात हुशार नव्हतो पण खेळाची प्रचंड आवड होती. आमच्या जडणघडणीत अंजली चिंतामण,आत्माराम झरेकर, विद्यावर्धिनी मुळे या शिक्षकांचा मोलाचा वाटा होता.

विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका अंजली चिंतामण, शिक्षिका विद्यावर्धिनी मुळे यांनी आपल्या मनोगतात या यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व अशा विद्यार्थ्यांचा तुम्ही आदर्श घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुधाडे यांनी केले तर आभार सुभाष बर्डे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## मंगळवारी मुळे जीवनगौरव पुरस्कार सोहळा

**अहिल्यानगर :** स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठेचा शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवनगौरव पुरस्कार यावर्षी स्व. शिक्षण महर्षी मधुराजे मुळे तथा आबा यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

याच दिवशी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा देखील आयोजित करण्यात आली असून, हा संयुक्त कार्यक्रम दुपारी ३.०० वाजता कायनेटिक चौक येथील यश ग्रॅण्ड हॉटेल येथे पार पडणार आहे.

यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिका तथा महिला बँकेच्या संस्थापिका मा. प्रा. मेधाताई यशवंतराव काळे यांना प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या साहित्यिक आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा यावेळी गौरव केला जाणार आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे भूषविणार आहेत. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षणप्रेमी, साहित्यिक व समाजबांधव यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे.

पुरस्कार वितरणासोबतच प्रतिष्ठानच्या वार्षिक कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे.

## सेवापूर्ती निरोप व सत्कार समारंभ उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**एरंडगांव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक श्री. भगवान कचरू पागर सर यांच्या सेवापूर्ती निमित्त कृतज्ञता समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास शेवगाव पंचायत समिती मा. सभापती डॉ. क्षितीज घुले पाटील यांनी उपस्थित राहुन पागर यांचा सपत्नीक सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी त्यांनी पागर सर यांच्या प्रदीर्घ व गुणवत्तापूर्ण सेवेला उजाळा देत त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोलाच्या योगदानाचे मनापासून कौतुक केले तसेच पुढील आयुष्यासाठी निरोगी, आनंदी व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.




या प्रसंगी ह.भ.प. सुदामदेव महाराज शास्त्री, ह.भ.प. बोरुडे महाराज, मा. शब्बीर शेठ, अनिलराव मडके, बबन भुसारी, अंबादास कळमकर, विष्णू जगदाळे, गणेशजी खंबरे, राजुभाऊ पाऊलबुद्धे, जाधव भाऊसाहेब, बाळासाहेब मरकड, वाय.डी. कोल्हे, पत्रकार रविंद्र मडके, दत्ता माळवडे, राजू पानकर, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन सर, संस्था समन्वयक विजय काशीद , प्राचार्य खैरे सर, पर्यवेक्षक नांगरे सर, प्राचार्य कोलते सर, जाधव सर यांच्यासह विविध युनिटचे मुख्याध्यापक, पदाधिकारी, ग्रामस्थ, नातेवाईक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब मंडलिक यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष अडकिते यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

# वाडिया पार्कवर मनपा क्रीडा स्पर्धांचा जल्लोष

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्साह शिगेला; धावणे, जलद चालणे, गोळाफेक व कॅरम स्पर्धांमध्ये चुरस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील वाडिया पार्क येथे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून संपूर्ण क्रीडांगणावर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विविध क्रीडा प्रकारांमधून कर्मचाऱ्यांनी आपली ऊर्जा, कौशल्य आणि सांघिक भावना प्रभावीपणे सादर केली.

या स्पर्धांमध्ये धावणे, जलद गतीने चालणे, गोळाफेक आणि कॅरम अशा विविध प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. प्रत्येक स्पर्धेत चुरशीची लढत पाहायला मिळाली. सहभागी खेळाडूंनी जिंकण्याच्या जिद्दीने उत्कृष्ट कामगिरी करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महिला कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर झालेला सहभाग. त्यांनी उत्साहाने मैदानात



उतरून आपले कौशल्य सिद्ध केले. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धांना अधिक रंगत आली आणि महिला सक्षमीकरणाचे प्रेरणादायी चित्रही उभे राहिले. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांना धकाधकीच्या दिनचर्येतून थोडा विरंगुळा मिळत असून शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक समाधान साध्य होत आहे. क्रीडा स्पर्धा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून निरोगी जीवनशैलीकडे नेणारा महत्त्वाचा मार्ग असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

मनपा क्रीडा अधिकारी फिलिप्स यांनी सांगितले की, नियमित खेळ आणि व्यायामामुळे शरीर निरोगी राहते, तसेच मानसिक ताण कमी होतो. अशा स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकजूट, समन्वय आणि सांघिकतेची भावना अधिक दृढ होते.

स्पर्धेदरम्यान प्रेक्षकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सहकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. संपूर्ण वातावरणात उत्साह, आनंद आणि सकारात्मक ऊर्जा जाणवत होती.

महापालिकेच्या वतीने सर्व सहभागी खेळाडूंचे कौतुक करण्यात आले. या क्रीडा स्पर्धांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कामासोबत आरोग्य या संकल्पनेला बळकटी मिळाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले.

# लेक लाडकी योजनेअंतर्गत जिल्ह्यात ९ हजाराहून अधिक मुलींना लाभ

## मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील

**पुणे :** राज्यातील मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरु करण्यात आलेल्या लेक लाडकी योजनेअंतर्गत जिल्ह्यात १ एप्रिल २०२३ नंतर जन्म झालेल्या ९ हजार ४८२ मुलींना मागील तीन वर्षात ४ कोटी ७४ लाख १० हजार रुपये लाभ देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे. तसेच या योजनेचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. .पहिला हप्ता प्रति लाभार्थी रु ५ हजार रुपयाप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १ हजार ४० मुलींना ७० लाख रुपये, सन २०२४-२५ मध्ये ५ हजार ७२० मुलींना २ कोटी ८६ लाख रुपये आणि सन २०२५-२६ मध्ये २ हजार ३६२ मुलींना १ कोटी १८ लाख १० हजार रुपयांचा लाभ देण्यात आलेला आहे. मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढवणे,मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलीचा मृत्यूदर कमी करणे, बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे. शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शुन्यावर आणण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेच्या अटी शर्ती पुढील प्रमाणे: लाभार्थ्यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावे. लाभार्थी बँकेचे खाते असावे. कुंटुंबांचे वार्षिक उत्पन १ लक्ष पेक्षा जास्त नसावे. ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुंटुंबामध्ये १ एप्रिल २०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन बालिकांसाठी लागू आहे. एक मुलगा व मुलगी असल्यास मुलीला लागू आहे. मुलीच्या जन्मानंतर रक्कम ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, इयत्ता सातवीत ७ हजार, इयत्ता अकरावीत ८ हजार, मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये असे मिळून १ लाख १ हजार रुपयाचा लाभ देण्यात येतो. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील, बालकल्याण सभापती अंकिता पाटील यांनी जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण संतुलित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासोबतच महिला सक्षमीकरणाकरिता प्रभावी योजनांची आखणी करून अंमलबजावणी करण्याचेनिर्देश दिले आहेत, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) आनंद खंडागळे यांनी दिली आहे.

## कोयत्याचा वार करत प्रेमी युगलाला लुटणारा आरोपी अखेर 'जेरबंद'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तांदुळवाडी :** येथील एलसी कंपनी लेक परिसरात तरुणावर कोयत्याने हल्ला करून लूट करणाऱ्या आरोपीला अखेर बारामती तालुका पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून सोन्याची साखळी जप्त करण्यात आली आहे दि. १६ जून २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास पुलकुंडवार (बदललेले नाव) (वय २२, रा. मार्केटयार्ड, बारामती) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक परिसरातील मोकळ्या जागेत बसले होते. यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी तोंडाला रूमाल बांधून त्यांच्यावर



हल्ला चढवला. यातील एका आरोपीने देवराज यांना मोबाईल व पैसे देण्याची मागणी केली. त्यांनी विरोध केल्याने आरोपीने लोखंडी कोयत्याने त्यांच्या उजव्या पायाच्या गुडघ्यावर व मांडीवर वार करून त्यांना जखमी केले. त्यानंतर आरोपींनी जबरदस्तीने देवराज यांच्याकडील २,५०० रुपये रोख रक्कम व पोको कंपनीचा मोबाईल हिसकावून घेतला. तसेच त्यांच्या मैत्रिणीच्या गळ्यातील सुमारे ५० हजार रुपये किमतीची सोन्याची चैनही काढून घेतली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी त्यांच्या मोटारसायकलची चावी घेऊन घटनास्थळावरून पळ काढला.

या प्रकरणी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यानंतर आरोपी फरार होते. मात्र पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे तपास करत आरोपी अजय नंदकुमार सकट (रा.तांदुळवाडी, ता.बारामती) याला दि. १५ एप्रिल २०२६ रोजी अटक केली. अटक केलेल्या आरोपीकडून सुमारे ५० हजार रुपये किमतीची ४.९०० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी हस्तगत करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, तसेच पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ भारत खारतोडे मनोज पवार नितीन ढवाण निलेश वाकळे आणि राजू बन्ने शाहरुख शेख यांच्या पथकाने केली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील व पोलीस अंमलदार राजू बन्ने करीत आहेत.

## बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील उमेदवारांच्या खर्चाची दुसरी तपासणी पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** आगामी २३ एप्रिल रोजी होणाऱ्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक खर्चावर काटेकोर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त खर्च निरीक्षक बनोत अखिल रामनाईक यांनी उमेदवारांच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची दुसरी तपासणी आज पूर्ण केली. या पोटनिवडणुकीत एकूण २३ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, निवडणूक कालावधीत त्यांच्या खर्चाची एकूण तीन टप्प्यांत तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार पहिली तपासणी १३ एप्रिल रोजी पार पडली होती, तर दुसरी तपासणी १७ एप्रिल रोजी पूर्ण झाली आहे. तिसरी आणि अंतिम तपासणी २१ एप्रिल रोजी होणार आहे. आज झालेल्या तपासणीदरम्यान २३ पैकी २२ उमेदवारांनी आतापर्यंतचा दैनंदिन निवडणूक खर्चाचा अहवाल खर्च निरीक्षकांकडे सादर केला. सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या नोंदींची सखोल पडताळणी करण्यात आली. यावेळी सहाय्यक खर्च निरीक्षक सुरेंद्र वाघमारे, संजय शेलार, खर्च पथक प्रमुख तुषार मोरे, व्हिडिओ व्हिजिलन्स टीम (ततढ) प्रमुख श्री. लोदडे तसेच खर्च पथकातील सदस्य अशोक शिरतोडे, स्वप्नील आपुणे, स्वाती दराडे, अक्षय मांडवे, प्राची सपकाळ आणि सागर जगताप उपस्थित होते.

# कवठे येमाईत श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न

## मलठण महसूल मंडळ विभागाकडून आयोजन




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - शासनाच्या विविध योजनांचा सर्व सामान्य नागरिक व लाभार्थ्यांना फायदा व्हावा व नागरिकांची महसूल विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या कामांचा त्वरेने निपटारा व्हावा या हेतूने शिरूर तालुक्यातील मलठण महसूल मंडल कार्यालयांतर्गत येणाऱ्या १० ते १२ गावातील नागरिकांच्या सेवा सुविधेसाठी कवठे येमाई येथील श्री माहेश्वरी मंगल कार्यालयात काल दि. १८ ला एक दिवशीय शिबीर संपन्न झाल्याची माहिती मंडल अधिकारी विजय फाळके यांनी दिली.

कार्यक्रमास भीमाशंकर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीपदादा वळसे पाटील,शिरूरचे माजी पोपटराव गावडे,शिरूर,पुणे शहर उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी,शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,पंचायत समिती सदस्या कांचनताई सांडभोर,माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे,सरपंच मनीषा भोर, सर्वच शासकीय विभागाचे विभागप्रमुख,सर्व गावचे सरपंच,उपसरपंच, पोलिस पाटील,शेतकरी,नागरिक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या एकदिवसीय शिबिरात प्रामुख्याने ७९ निर्गत फेरफार,५ अर्ज ७/१२ दुरुस्तीसाठी स्वीकृती,यावेळी ४७ डिजिटल ७/१२ उतारे १५ आठ अ चे उतारे उपलब्ध करून देण्यात आले. २६ आयुष्यमान भारत व २६ आभा कार्ड आरोग्य काढण्यात आले. ५० आधारकार्ड,१० नकाशे,११० उत्पन्नाचे दाखले,रहिवाशी प्रमाणपत्र ५१,नॉन क्रिमीलेअर ३१,जातीचे दाखले १७,अपघाती विमा २०,रेशनकार्ड १०,संजय गांधी मंजूर प्रकरणे १२,सामाजिक अर्थसहाय्य योजना अर्ज स्वीकृती ६२,समाज कल्याण विभाग १०,जिवंत ७/१२ मोहिमे अंतर्गत अभिलेख उपलब्धी २,पाणंद रस्त्याचे प्रशासकीय मान्यतेचे निर्गमित आदेश १ अशी विविध मार्गी लावण्यात आली. शिबिरातून मिळालेल्या शासकीय सेवे बाबत उपस्थित अनेक नागरिक व महिलांनी समाधान व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवावेत : डॉ.भाऊसाहेब कारेकर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

''**सासवड** : पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन पुरंदर हायस्कुल सासवड याठिकाणी करण्यात आले होते.

या बैठकीत शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्तावाढ, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शाळास्तरीय उपक्रम तसेच शासकीय योजनांची अंमलबजावणी,आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा, तसेच एनएमएमएस शिष्यवृत्तीबाबत माहिती देण्यात आली.शाळांमध्ये पायाभूत सुविधा सुधारणा, डिजिटल साधनांचा करावा,याशिवाय सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी समन्वयाने काम करावे,तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवण्यावर भर देण्यात यावा असे पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्या वतीने आवाहन करण्यात आले.



पुरंदर हायस्कूल, सासवड येथे आयोजित पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या जिल्हास्तरीय बैठकीत शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर मार्गदर्शन करताना; व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने गुणवत्ता संवर्धन अभियान राबवण्यात आले होते त्यामध्ये सहभागी झालेल्या शाळेचे व तालुक्यातील प्रथम आलेल्या शाळेचे सत्कार समारंभ गणेश कला क्रीडा मंच पुणे येथे होणार आहे त्याबाबत आढावा घेण्यात आला.पॅट परीक्षा व पट पडताळणी नियोजन करणे याबाबत डॉ.भाऊसाहेब कारेकर यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर यांनी आपल्या मनोगतात शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण सुधारणा, तसेच विविध शालेय उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन केले तसेच ३० एप्रिल पर्यंत विविध शैक्षणिक कामकाज पूर्ण करणे आणि शाळेच्या विकास आराखड्यावर लक्ष केंद्रित करणे यावर भर देण्यात आला. शालेय नोंदी अद्ययावत ठेवणे, शिक्षकांनी नियोजनबद्ध अध्यापन करावे असे आवाहन केले.

पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड व सचिव शिवाजी कामथे यांनी कार्यशाळेचे नियोजन केले,प्राचार्य इस्माईल सय्यद,तालुकाध्यक्ष दिलीप नेवसे व सचिव मारुती झगडे यांनी उपस्थिताचे स्वागत केले.

सदर कार्यशाळेप्रसंगी उपशिक्षणाधिकारी किशोर चंदेल,श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव सीताराम गवळी,संघाचे कार्याध्यक्ष राजेश गायकवाड,उपाध्यक्ष तबाजी वागदरे,कल्याण बरडे,सुधाकर जगदाळे,विद्यासचिव भानुदास रिठे,राज्यप्रवक्ते सुरेश कांचन,तज्ञ मार्गदर्शक महेंद्र गणपुले,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त कुंडलिक मेमाणे,पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्याचे अध्यक्ष ,सचिव व कार्यकारिणी सदस्य उपास्थित होते.

## मीना शाखा कालवा प्रश्नांवर मंत्रालयात ठोस चर्चा; लवकरच निर्णयाची शक्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** जुन्नर,शिरूर तालुका परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मीना शाखा कालव्याच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आता लवकरच तोडगा निघण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जलसंपदा विभागाने या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत कार्यवाहीचे आश्वासन दिल्याने शेतकरी वर्गात आशावाद निर्माण झाला आहे. घोड व कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सदस्य तसेच मीना शाखा कालवा अध्यक्ष प्रकाश हनुमंत वायसे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्रालयात जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मीना शाखा कालव्याशी संबंधित सुमारे २८ पाणी वापर संस्थांना पूर्ण दाबाने पाणी मिळत नसल्याची गंभीर समस्या मांडण्यात आली. कालव्याचे अस्तरीकरण, अनेक ठिकाणी झालेला भराव, टेल डी-वाय लायनिंगची तातडीची गरज आणि १०० हून अधिक गेट्स दुरुस्तीची आवश्यकता याकडेही लक्ष वेधण्यात आले. तसेच डी. वाय-१ व डी.वाय-२ कालव्यांची वहन क्षमता वाढवणे, ळती रोखणे, अतिक्रमण हटवणे आणि पाणी वापर संस्थांना त्यांच्या कोट्यानुसार पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. भूसंपादन व मोबदला प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना होत असलेल्या नुकसानीचा ही मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. यावर सचिव डॉ. बेलसरे यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय ाधून संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन दिले. या प्रश्नांवर लवकरच ठोस निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या चर्चेसाठी मीना शाखा कालव्याच्या विविध पाणी वापर संस्थांचे प्रतिनिधी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीनंतर मीना शाखा कालव्याच्या प्रश्नांना गती मिळण्याची शक्यता असून शेतकऱ्यांच्या अपेक्षा आता उंचावल्या आहेत.



# पुणे जिल्ह्यात 'एकल महिला सक्षमीकरण' उपक्रमाला मोठा प्रतिसाद

## ७० हजारांहून अधिक महिलांचा सहभाग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

''**नाझरे सुपे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'एकल महिला सक्षमीकरण' उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयोजित ११७ कॅम्पमधून तब्बल ७०,५५८ एकल महिलांनी सहभाग नोंदविला आहे. या उपक्रमांतर्गत महिलांना शासकीय योजनांची माहिती, आरोग्य तपासणी, तसेच स्वावलंबनासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत असून, महिलांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत आहे.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिला सक्षमीकरण केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक असल्याने, पुणे जिल्हा परिषदेकडून 'माझे अस्तित्व' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत एकल महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पाची संकल्पना मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी मांडली असून, राज्यभर हा उपक्रम राबविण्याचा मानस आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, सुमारे १,०९,००० महिलांची नोंद करण्यात आली आहे. त्यापैकी ७० हजारांहून अधिक महिलांनी विविध कॅम्पमध्ये सहभाग घेतला आहे.

**''शासकीय योजनांचा लाभ''**

या उपक्रमांतर्गत महिलांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला आहे. त्यामध्ये बाल संगोपन प्रस्ताव (२०९१), स्वयं सहाय्यता गटांमार्फत लाभ (२१७६), संजय गांधी निराधार योजना (१३७८), प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (१६४८) आणि पीएम किसान/नमो शेतकरी योजना (२२२४) यांचा समावेश आहे.

**''आरोग्य तपासणीवर विशेष भर''**

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर तपासण्या करण्यात आल्या. नेत्र तपासणी १७,०३३, एनसीडी तपासणी २३,६४९, मधुमेह तपासणी १६,२८० तसेच कर्करोग तपासण्या मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्या.

**''तालुकानिहाय कामगिरीत पुरंदरची ठळक नोंद''**

पुरंदर तालुक्यात आयोजित कॅम्पमध्ये ५२४ महिलांनी सहभाग घेतला. शासकीय योजनांचा लाभ, आरोग्य तपासणी व रोजगार मार्गदर्शनामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढताना दिसत आहे.

**''प्रशासनाचा पुढाकार व डिजिटल पाऊल''**

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष माननीय वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष माननीय विवेक वळसे पाटील तसेच महिला व बालकल्याण सभापती माननीय अंकिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. यासाठी एकल महिलांसाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल तयार करण्यात येणार असून, प्रत्येक लाभार्थ्याचा नियमित पाठपुरावा करण्यात येणार आहे.

**''महिलांसाठी सर्वंकष सुविधा''**

या उपक्रमांतर्गत महिलांना आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'एकल महिला सक्षमीकरण' हा उपक्रम पुणे जिल्ह्यात महिलांसाठी परिवर्तनकारी ठरत असून, त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा मानस आहे. अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) आनंद खंडागळे यांनी दिली.



पुणे जिल्हा परिषदेच्या 'एकल महिला सक्षमीकरण' उपक्रमांतर्गत आयोजित कॅम्पमध्ये मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी महिलांना प्रमाणपत्र वितरण करताना तसेच सहभागी महिलांसमवेत समूह छायाचित्र

## द • ख • ल

### इंद्रायणी स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

#### आळंदीत अभियान उत्साहात

**आळंदी :** इंद्रायणी नदी स्वच्छता अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि आळंदी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी सकाळी नदीघाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या या उपक्रमात एन.एस.एस. विभागातील विद्यार्थी व स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नदीघाट तसेच नदीपात्रातील कचरा, प्लास्टिक व टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासोबत स्वच्छतेबाबत जनजागृतीचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात मोलाचा सहभाग नोंदवल्याबद्दल महाविद्यालयाच्या एन.एस.एस विभागाचा आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा फोटो तसेच लेखक शरद बाविस्कर लिखित 'भूरा' हे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि मुख्याधिकारी माधव खांडेकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या सामाजिक बांधिलकीचे त्यांनी कौतुक करत, अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे नमूद केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालय व एन.एस. एस विभागाचे नगरपरिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले.




### टी. सी. महाविद्यालयातील २५० विद्यार्थ्यांनी घेतली मतदानाची शपथ

**बारामती :** बारामती विधानसभा पोटनिवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृतीसाठी अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय तसेच अनेकांत फार्मसी महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदानाची शपथ घेतली. दोन्ही महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग दर्शविला. निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. बारामती तालुका मतदान प्रचार-प्रसिद्धी प्रमुख सौ. सविता खारतोडे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची जबाबदारी तसेच मतदान प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. दर्शन शहा तसेच परीक्षा विभाग प्रमुख डॉ. वैशाली पाटील उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत मतदानाबाबत जागरूक राहण्याचा संकल्प व्यक्त केला.



### भारनियमनाच्या निषेधार्थ आंदोलनाला लेखी आश्वासनानंतर स्थगिती

**शिरूर :** शिरूर शहर व ग्रामीण परिसरात वारंवार होणाऱ्या मोठ्या प्रमाणात भारनियमनाच्या निषेधार्थ भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने अध्यक्ष सुशांत कुटे यांनी शिरूर महावितरण कार्यालयासमोर शुक्रवार दि.१७ पासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते या आंदोलनाची दखल घेऊन शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता शरद माने यांनी मागण्या मान्य करून लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी सांगितले. यावेळी शिरूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष रविंद्र ढाबळे,भाजपचे नगरसेवक सागर नरवडे,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष किरण बनकर,रिपब्लिक पार्टीचे अध्यक्ष निलेश जाधव,माजी नगरसेवक मंगेश खांडरे,युवा सेनेचे शहराध्यक्ष स्वप्नील रेड्डी,शिक्षण मंडळाचे माजी सभापती संतोष शितोळे,बंडू दुधाणे,विनोद साठे,संतोष बोराडे,युवराज दुधाणे आदि उपस्थित होते.




### प्रतीकात्मक होळी करून आंदोलन

**वळती :** आदिवासी विकास विभागातील राज्यस्तरीय वर्ग ४ कर्मचारी संघटनेच्या वतीने आज दि. १८ एप्रिल २०२६ रोजी राज्यभर निषेध व्यक्त करण्यात आला. शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधिक्षक संघटनेने दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सर्व जिल्हाधिकारी, अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातील मुद्दा क्रमांक ७ हा वर्ग ४ कर्मचाऱ्यांविषयी चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या निषेधाच्या पार्श्वभूमीवर संबंधित निवेदनाची प्रतीकात्मक होळी करून राज्यातील विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आले. संघटनेचे म्हणणे आहे की, आदिवासी विकास विभागाचा कणा मानले जाणारे वर्ग ४ कर्मचारी सध्या अत्यंत कठीण परिस्थितीत काम करत आहेत. दररोज सकाळी विद्यार्थ्यांना नाश्ता देण्यासाठी कर्मचारी पहाटे ६ वाजताच कामावर हजर होतात, तर दिवसभरातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांना रात्री ८ ते ८.३० वाजेपर्यंत काम करावे लागते. यामध्ये विद्यार्थ्यांची देखभाल, आजारी विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेणे, वर्गखोल्या व वसतिगृहांची स्वच्छता, शौचालय-बाथरूम स्वच्छता, तसेच शाळा परिसराची देखभाल अशा अनेक कामांचा समावेश आहे. मोठ्या इमारती, तीन मजली वसतिगृहे आणि अपुऱ्या मनुष्यबळामुळे कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण येत असल्याचे संघटनेने नमूद केले. अशा परिस्थितीतही कर्मचारी प्रामाणिकपणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असताना, त्यांची केवळ ८ तासांची ड्युटी असल्याचे निवेदनात नमूद करणे चुकीचे व अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.



द•ख•ल



## ढाकणे शैक्षणिक संकुल येथे समर्थ महाराजांची पुण्यतिथी साजरी

**शेवगाव :** समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग शेवगाव राक्षी या ठिकाणी श्री स्वामी समर्थ महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सकाळी महाराजांना दुग्धाभिषेक घालून नवीन वस्त्र अलंकार परिधान केले यानंतर ब्राह्मणाच्या मंत्रक्षरात पूजाअर्चा ज्येष्ठ सेवेकरी एकनाथराव ढाकणे यांच्या हस्ते संपन्न झाली यानंतर श्रीकांत ढाकणे ऋषिकेश ढाकणे सहकुटुंब यांच्या हस्ते महाराजांची आरती संपन्न झाली या प्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी ग्रामस्थ विश्वस्त मोठ्या विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते याप्रसंगी एकनाथराव ढाकणे यांनी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या जीवनकार्याचा परिचय दिला व शुद्ध शाकाहार मानवी आहार महाराजांना अभिप्रेत असून मनोभावे सेवा केल्यास निश्चितपणे फलश्रुपती प्राप्त होते असे सांगितले स्वामी समर्थ संप्रदायाची नियम विशद केले याप्रसंगी सर्व सेवेकरी भक्त यांनी स्वामी चरित्र चे २१ अध्याय सामूहिक वाचन केले आणि बुंदीच्या प्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ढवळगावच्या सुपुत्राची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

**श्रीगोंदा :** ढवळगाव येथील सुपुत्र दत्तात्रय



बाळासाहेब शिंदे यांची महाराष्ट्र पोलीस दलात मुंबई लोहमार्ग या घटकात उत्तम गुणांसह निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल पंचक्रोशीतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दत्तात्रय शिंदे यांनी गेल्या ८ वर्षांपासून अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांनी २०१७ साली पहिला प्रयत्न केला होता. मात्र, प्रत्येक वेळी अत्यंत कमी फरकाने यश हुलकावणी देत राहिले. मागील वर्षी नवी मुंबई येथे केवळ १ गुणाने ते प्रतीक्षा यादीत राहिले होते. तरीही न खचता त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू ठेवले आणि यंदा मोठ्या फरकाने यश मिळवत आपले स्वप्न पूर्ण केले. दत्तात्रय शिंदे यांनी एका यशावर समाधान न मानता भविष्यात उपविभागीय पोलीस अधिकारी (उ्धडझ) होण्याचे ध्येय ठेवले असून त्यासाठी तयारी सुरू ठेवणार असल्याचे सांगितले आहे.शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांसोबतच ते वैयक्तिक आयुष्यात एक उत्कृष्ट टेनिस क्रिकेटपटू म्हणूनही ओळखले जातात. तसेच त्यांना पत्रकारितेचीही आवड आहे. ते माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांचे नातू आहेत.त्यांच्या या यशामुळे ढवळगावसह परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संत गोरोबा काका समाधी सोहळा उत्साहात

**अहिल्यानगर :** शहरातील कुंभार गल्ली, नालेगाव येथे संत गोरोबा काका समाधी सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सोहळ्यात सहभाग नोंदविला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबिर होय. स्थानिक नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच विविध कीर्तन, भजन व धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिकच भारावून गेले. कार्यक्रमास नगर शहराचे लाडके आमदार संग्राम भैय्या जगताप तसेच पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढविली. त्यांच्या उपस्थितीमुळे आयोजकांचा उत्साह दुपटीने वाढला. मान्यवरांनी संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत अशा कार्यक्रमांमुळे समाजात एकात्मता वाढते, असे मत व्यक्त केले.

## चैतन्य टेक्नो विद्यालयात दहावीच्या 'टॉप १०' विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्कार

**अहिल्यानगर :** दहावीच्या बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्यासाठी जाधव नगर, नगर-कल्याण रोड येथील उद्धव अकॅडेमी संचालित श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये विशेष सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी इयत्ता दहावीतील 'टॉप १०' गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उद्धव अकॅडेमीच्या माजी प्राचार्या सौ. निशिता जयंत जाधव तसेच सचिव ड. जयंत मच्छिन्द्रनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या प्राचार्या के. अन्सी मॅडम, डीन के. सुमन सर, शाखा विस्तार अधिकारी शशी कुमार सर, समन्वयिका सौ. पायल खंडेलवाल, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या यशामागील शिक्षकांचे परिश्रम व पालकांचे सहकार्य अधोरेखित केले.

## सिस्पे इन्फिनिटी बिकन प्रकरणी

# न्यायासाठी बेमुदत आमरण उपोषण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सिस्पे इन्फिनिटी बिकन या आर्थिक फसवणूक प्रकरणात न्याय मिळावा, तसेच पोलीस तपासातील कथित अकार्यक्षमतेविरोधात ठेवीदारांनी सुरू केलेले बेमुदत आमरण उपोषण चौथ्या दिवशीही सुरूच असून प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस दखल घेतलेली नाही.

गेल्या आठ महिन्यांपासून या प्रकरणात न्यायालयीन तसेच आंदोलनात्मक पातळीवर लढा सुरू असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. मात्र, पोलीस प्रशासनाकडून अद्यापही मूलभूत मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये कंपनीचे संचालक अगस्ती मिश्रा, नवनाथ जगन्नाथ अवताडे, विनोद बबन गाडीलकर, विक्रम बबन गाडीलकर आणि संदीप संपत दरेकर यांना तात्काळ अटक करण्याची मागणी आहे. तसेच अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करून जाणीवपूर्वक अटकेपासून संरक्षण मिळवणाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

शुभम अवताडे व सुवर्णा अवताडे यांचे जामीन अर्ज फेटाळण्यात आले असतानाही त्यांना अटक का करण्यात आलेली नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्टीकरण द्यावे, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. याशिवाय, एलएलपी स्वरूपात नोंदणीकृत संबंधित कंपन्यांच्या संचालकांनाही अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली रक्कम तात्काळ पीडित गुंतवणूकदारांना परत करण्यात यावी, तसेच गुंतवणूकदारांच्या वतीने न्यायालयीन कामकाज पाहणारे अँड. शुभम रमेशराव साके-पाटील यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी आहे.

या सर्व मागण्यांसाठी १६ एप्रिलपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.

या उपोषणात बाबा आप्पा दराडे, अनिल सुभाष तरटे, गोवर्धन गोरक्षनाथ मगर यांच्यासह मोठ्या संख्येने ठेवीदार सहभागी झाले आहेत.

## शिक्षक हा भविष्याची संस्कारक्षम पिढी घडवितो : दीपक खोसे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** जगातील सर्वात उत्कृष्ट शिक्षक हे आई वडील घडविणारा शिक्षक असतात. शिक्षक हा विद्यार्थी व पालक यांच्यामधील प्रमुख दुवा असतो. आपल्या पाल्यांची शैक्षणिक प्रगती संदर्भात प्रत्येक पालकांनी शिक्षकाशी सल्ला मसलत करण्याची गरज आसुन आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय हे ज्ञानाचे महाद्वार आसुन येथे चांगला गुणवान विद्यार्थी घडवले जात असुन एक शिक्षक हा भविष्याची संस्कारक्षम पिढी घडवितो असे प्रतिपादन पत्रकार दीपक खोसे यांनी बोलताना केले.

नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाचे आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय शेवगांव येथे आयोजित पालक मेळाव्याप्रसंगी खोसे बोलत होते. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आबासाहेब काकडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य भगवान बारस्कर,होते यावेळी पत्रकार प्रविण खोमणे, प्रा.राजेंद्र बांगर , प्रा राजेंद्र काळे, प्रा स्मिता नाईक, प्रा अनिता भालसिंग लहू कोठूळे आदीसह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ भगवान बारस्कर बोलताना म्हणाले की शिक्षकांचे ज्ञानदानाचे कार्य म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होय. एक सुसंस्कृत विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांचे मोलाचे योगदान असुन विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाप्रती प्रामाणिक असावे व पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष द्यावे वेळोवेळी महाविद्यालयाला भेट देऊन शिक्षकांशी संवाद साधला जावा हा पालक मेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे बारस्कर यांनी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा राम नेव्हुल यांनी केले तर सुत्रसंचालन व अभार प्रा स्मिता नाईक यांनी मानले.यावेळी प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंथन परीक्षेत लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे १२४ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**अहिल्यानगर :** रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप उमटवली आहे. शाळेतील तब्बल १२४ विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवरील गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

यामध्ये ३ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत, ३२ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर ८९ विद्यार्थ्यांनी केंद्र गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता दुसरीतील ओजस्वी स्वप्निल भोरे व आयुष योगेश गंभीरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच इयत्ता चौथीतील आस्था निलेश सुंबे हिने राज्यात पाचवा क्रमांक पटकावत शाळेचा गौरव वाढविला आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल कमिटी सदस्य अर्जुनराव पोकळे व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांच्या हस्ते शाळेत विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, संस्थेचे लाइफ मेंबर सदस्य शिवाजीराव लंके, प्राचार्य छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनुभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, कांचन मदने, पुनम धाडगे व रूपाली पांडुळे यांनी मार्गदर्शन करुन परीक्षेची तयारी करुन घेतली होती. या विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन फ्री पास; दीर्घ लढ्याला अखेर यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन मोफत प्रवासाचा पास मिळावा, या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर यश मिळाले असून, एसटी महामंडळाने ही मागणी मान्य केली आहे. सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याने राज्यभरातील हजारो कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर विभागाच्या वतीने जेऊर बायजाबाई (ता. नगर) येथे विजयी मेळावा उत्साहात पार पडला. संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात कार्याध्यक्ष अर्जुनराव बकरे, राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे यांचा अभिनंदन ठराव मांडण्यात आला. या ठरावाला गोरख बेळगे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सदस्यांनी राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य यांचे अभिनंदन ठराव टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने मंजूर केला.

यावेळी बोलताना बलभीम कुबडे यांनी सांगितले की, संघटनेच्या एकजुटीच्या बळावर आणि सभासदांच्या ताकदीवर हा लढा यशस्वी झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर पूर्ण झाली असून, यामुळे राज्यातील सुमारे ४६ हजार सेवानिवृत्त एसटी कर्मचारी, त्यांचे पती-पत्नी तसेच विधवा महिलांना वर्षभर मोफत एसटी प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

पूर्वी १९९६ पासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दोन महिने, सहा महिने किंवा नऊ महिन्यांच्या कालावधीसाठीच मोफत पास दिला जात होता. मात्र, हा पास कायमस्वरूपी (१२ महिने) मिळावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात होती. अखेर शासन आणि परिवहन मंडळाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

या प्रसंगी ज्ञानदेव अकोलकर, शिवाजी कडूस, अरुण दळवी यांनी संघटनेच्या कामकाजावर विश्वास व्यक्त करत कामगारांच्या प्रश्नांसाठी आवश्यक तेव्हा आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले.

मेळाव्यात संघटनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मगर, माजी विभागीय वाहतूक अधिकारी बाळासाहेब चव्हाण, भाऊसाहेब तोडमल तसेच जेऊर येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विठ्ठल देवकर यांनी आभार मानले.

## कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदे तालुक्याचे सुपुत्र शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व संयमी व्यक्तिमत्व श्री नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीकजी सुरासे यांनी श्री कुरुमकर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले आहे. श्री कुरुमकर यांना सेवानिवृत्तीनंतर शिक्षकेतर महासंघाने त्यांच्या प्रदीर्घ गुणवत्तेवर त्यांना हे निवडीने गिफ्ट दिले आहे.

दरम्यान नंदकुमार कुरुमकर यांनी गेली ३८ वर्ष राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे व माजी अध्यक्ष एस. डी. डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली महासंघामध्ये अगदी प्रामाणिकपणे योगदान देत महासंघाला मोठे बळ दिले. श्री कुरुमकर हे १९९२ सालापासून शिक्षकेतर महासंघात सक्रिय आहेत. महासंघाच्या माध्यमातून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा एक बुलंद आवाज म्हणून त्यांच्याकडे कर्मचारी वर्ग मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात श्री कुरुमकर यांनी प्रसिद्धीच्या माध्यमातून शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले. त्यामध्ये अनेक मागण्या श्री कुरुमकर यांच्या प्रसिद्धीच्या पुढाकारातून मार्गी लागल्या आहेत. प्रामुख्याने वंचित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बारा वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ, २४ वर्षाची आश्वासित प्रगती योजना, नाईक पदावर झालेला अन्याय, शिक्षकेतरांचा नवीन आकृतीबंध त्यातून होणारे शिक्षकेतरांचे तोटे, अनुकंपा तत्वावर शिक्षकेतर भरती २००५ पासून बंद असलेली शिक्षकेतरांची भरती बाबत श्री कुरुमकर यांनी वेळोवेळी महासंघाशी संपर्क साधून शासनाला आपल्या भावना कळविल्या. त्याबरोबरच २००६ रोजी औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाच्या बैठकीवर विराट राज्यव्यापी आंदोलनातही त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला.

राज्यातील शिक्षकेतरांच्या अनेक प्रलंबित प्रमुख मागण्या शासन स्तरावर प्रलंबित आहेत. त्याचाही पाठपुरावा राज्याध्यक्ष वाल्मीक सुरासे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. श्री नंदकुमार कुरुमकर यांनी श्रीगोंदा तालुक्यात संघटनेचे अध्यक्षपद भूषवत असताना प्रत्येक विद्यालयाला भेटी देऊन शिक्षकेतरांच्या अडचणी व भावना समजून घेऊन सामंजस्याने संस्था विद्यालय व कर्मचारी यांचा समन्वय साधून मार्ग काढण्यात त्यांचा पुढाकार प्रेरणादायी ठरला.

## तमाशा कलावंतांवर अमानुष हल्ल्याचा दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध

**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे आयोजित करण्यात आलेल्या यात्रोत्सवात तमाशा कलावंतांवर झालेल्या अमानुष हल्ल्याचा राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी केली आहे. तसेच, कारवाई करण्यात विलंब झाल्यास संघटनेच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या तमाशा आणि लावणीसारख्या लोककलेवर गेल्या काही काळात वारंवार हल्ले होत असल्याचे चित्र दिसत आहे.

वडगाव सावताळ येथील बनाईदेवी यात्रोत्सवात कलावंतांना मारहाण करण्यात आली, तसेच महिला कलाकारांशी विटंबनाही करण्यात आली. ही घटना अत्यंत संतापजनक असून, अशा प्रकारच्या घटना आता सातत्याने घडत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी या घटनेचा निषेध नोंदविला.

# ५४३ वरून ८५० नव्हे; संख्येपेक्षा समज महत्त्वाची! ॲड.गवळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आलेले १३१वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत फेटाळण्यात आले आहे. या विधेयकात लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० करण्याचा प्रस्तावही समाविष्ट होता, तोदेखील नाकारण्यात आला.

या निर्णयामुळे देशाच्या संसदीय इतिहासात एक महत्त्वपूर्ण वळण नोंदवले गेले असून, संख्येपेक्षा समज महत्त्वाची हा मूलभूत विचार अधोरेखित झाल्याचे मत पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केले.

गेल्या १२ वर्षांतील लोकसभेतील हा सरकारचा पहिला मोठा पराभव मानला जात असून, महिलांच्या नावाखाली राज्यघटनेची संरचना बदलण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने सुरुवातीपासूनच या विधेयकाला तीव्र विरोध दर्शविला होता.

ही संख्या वाढ नव्हती; अराजकतेचा विस्तार होता!

ड. गवळी म्हणाले की, खासदारांची संख्या वाढवणे म्हणजे समस्यांची संख्या वाढवणे होय. अधिक प्रतिनिधी म्हणजे अधिक स्वार्थी प्रवृत्ती वाढण्याची शक्यता. संख्या वाढवणे म्हणजे लोकशाही बळकट करणे नव्हे, तर तिचा अनियंत्रित विस्तार करणे आहे, असा इशारा संघटनेच्या वतीने यापूर्वीच देण्यात आला होता.

या वेळी संसदेत वेगळे चित्र पाहायला मिळाले. अनेक खासदारांनी राजकीय गणित बाजूला ठेवत राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. जास्त लोक म्हणजे जास्त लोकशाही हा प्रचलित समज फेटाळण्यात आला. या निर्णयातून जाणीवाधारित शासन (RECONSCIO Governance) या संकल्पनेची झलक दिसून आली. लोकशाही ही केवळ आकड्यांची बेरीज नसून ती निर्णयांच्या गुणवत्तेवर आधारित असते, हे पुन्हा अधोरेखित झाले.

केवळ अंमलबजावणी वाढवून शासन सुधारत नाही. उलट चुकीच्या माहितीमुळे (अजनुकीय माहिती छत्रख्ख) शासनात अराजकता वाढते. भारताने जर केवळ संख्या वाढवण्याचा मार्ग स्वीकारला, तर संसद झुंडशाहीकडे झुकू शकते. निर्णय स्वार्थी केंद्राभिमुखतेवर आधारित होऊ शकतात आणि लोकशाही केवळ नावापुरती उरू शकते, असा इशाराही देण्यात आला.

पीपल्स हेल्पलाईनने जाणीव क्रांती ची गरज अधोरेखित केली आहे. शिक्षणाद्वारे अजनुकीय माहितीमध्ये सुधारणा, स्वार्थी केंद्राभिमुखतेचे समाजाभिमुख परिवर्तन, तसेच लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यांचा समन्वय साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जाणीवाधारित लोकांचे, जाणीवाधारित लोकांसाठी, जाणीवाधारित शासन हीच भविष्यातील लोकशाहीची दिशा आहे, असेही त्यांनी नमूद केले.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८


## बारामती निवडणुकीत सुनेत्रा पवारांसाठी पवार कुटुंब मैदानात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती** : पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी पवार कुटुंब पूर्ण ताकदीने मैदानात उतरले असून मतदारसंघात राजकीय रंगत वाढली आहे. जय पवार, पार्थ पवार, रोहित पवार आणि शर्मिला पवार यांच्यासह कुटुंबातील प्रमुख नेते गावोगावी दौरे करत आहेत.

सभा, पदयात्रा, कोपरा बैठका आणि घरभेटीद्वारे मतदारांशी संवाद साधत विकासकामांवर भर दिला जात आहे. सुनेत्रा पवार यांनी बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत मतदारांचा विश्वास मिळवण्याचा प्रयत्न केला. पवार कुटुंबाच्या एकजुटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढला असून युवक व महिलांचा प्रतिसादही सकारात्मक दिसतो. ही पोटनिवडणूक प्रतिष्ठेची ठरत असल्याने आगामी काळात प्रचार आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.